एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, गुरुवार १४ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-७०, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 70 Marathi - Daily - Mumbai, 14 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
"सोनं खरेदी बंद? मध्यमवर्गीयांचं काय?"
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews



## पेट्रोल-डिझेलची दरवाढ अटळ! पेट्रोलियम मंत्र्यांचे स्पष्ट संकेत

**मध्य पूर्वेतील युद्धाचे चटके आता भारताला अधिक बसू लागले आहेत. अमेरिका-इराण युद्धामुळे होर्मुज सामुद्रधुनी रोखण्यात आल्याने जगभरातील इंधन पुरवठा साखळी खंडित झाली आहे. परिणामी पेट्रोल-डिझेलची दरवाढ अटळ आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिप सिंह पुरी यांनी तसे स्पष्ट संकेत दिले. दरवाढ केली नाही तर तेल कंपन्यांना एका तिमाहीत १ लाख कोटी रुपयांचा तोटा होईल, असे पुरी म्हणाले. पेट्रोल-डिझेल हे लिटरमागे ३० ते ४० रुपयांनी महाग होईल अशी चर्चा आहे.**

■ नवी दिल्ली

**भारतीय** उद्योजकांची संघटना सीआयआयच्या वार्षिक शिखर परिषदेत बोलताना पुरी यांनी युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती दिली. युद्धामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यामध्ये अडथळे निर्माण होत आहेत. भारताकडे पुढील दोन महिने पुरेल एवढा तेलसाठा आहे. मात्र युद्ध थांबले नाही तर कच्च्या तेलाच्या किमती चढ्याच राहिल्या आणि किरकोळ विक्रीच्या दरात वाढ केली नाही तर सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांना एका तिमाहीमध्ये सुमारे १ लाख कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागेल, असे पुरी म्हणाले.

पुरी यांनी पेट्रोल-डिझेलची दरवाढ होणार असे स्पष्ट जरी म्हटले नसले तरी त्यांच्या पान ७ वर

### थोडक्यात...

#### कोळसे-पाटलांचा पाठिंबा लक्ष्मी ऑर्गेनिक विरुद्ध लढा

**पुणे** - कोकण नगरी संघर्ष समिती आणि लोटे पर्यावरण संरक्षण समितीच्या वतीने आज पुण्यात माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांची भेट घेतली. या भेटीत आंदोलनाला कायदेशीर आणि संवैधानिक पाठबळ देण्याबाबत त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली. न्या. कोळसे-पाटील यांनी आंदोलनाच्या कायदेशीर लढ्यासाठी आवश्यक ते सहकार्य देण्याची तयारी दर्शवली असून, आंदोलनाला आपला पूर्ण पाठिंबा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केल्याची माहिती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. या भेटीनंतर आंदोलनाला नवी ऊर्जा मिळाल्याचेही सांगण्यात आले. यावेळी अशोक जाधव, उदय घाग, रवींद्र गोवळकर, जितेंद्र आंब्रे, सुबोध सावंत-देसाई यांसह अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. भेटीनंतर कोकण नगरी संघर्ष समिती व लोटे पर्यावरण संरक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, लक्ष्मी ऑर्गेनिक विरुद्ध जे आंदोलन सुरू आहे, त्यात अनेक कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. या आंदोलनाला कोणताही एक नेता नाही.

# तटकरे-पटेलांसह २२ आमदार भाजपात जाणार?
# एकनाथ शिंदे गटाचेही १८ फुटणार! रोहित पवारांचा बॉम्ब

■ बारामती



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सध्या अंतर्गत संघर्ष उफाळून आला असून, पक्षातील गटबाजी शिगेला पोहोचली आहे. खासदार सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे पार्थ पवार यांच्या कार्यपद्धतीवर नाराज आहेत. याबाबतच पक्षातील वरिष्ठ नेत्यांची काल रात्री महत्त्वपूर्ण बैठक पार पडली ज्यामध्ये पार्थ पवार यांच्या कामकाजावर सखोल चर्चा करण्यात आली. ही चर्चा सुरू असतानाच रोहित पवार यांनी राजकीय बॉम्ब फोडला. ते पत्रकार परिषदेत म्हणाले की, तटकरे, पटेल यांच्यासह त्यांचे २२ आमदार भाजपात प्रवेश करून २०२९ ची निवडणूक भाजपाकडून लढवणार आहेत. शिंदेंचेही १८ आमदार फुटणार आहेत. सर्व तयारी झाली आहे.**



**आमदार** रोहित पवार म्हणाले की, राष्ट्रवादी आणि शिवसेना या दोन्ही पक्षांचे मिळून ४० आमदार भाजपात जाणार आहेत. ज्या गोष्टी ठरल्या आहेत, त्याविषयी मोघम बोलून चालत नाही. जे आहे ते आहे. ते आत्ताच प्रवेश करणार की, नंतर इतका विषय आहे. आत्ता प्रवेश केला तर निवडणूक लागेल आणि शिंदे गटच त्यांना पराभूत करील. भाजपासोबत जे आहेत, त्यांच्यासोबत आम्ही जाणार नाही.

रोहित पवार यांच्या दाव्याने खळबळ उडाली. त्यावर प्रतिक्रिया देत शिंदे गटाचे मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, राज्यात अनेक भोंदूबाबा आणि भविष्य सांगणाऱ्यांवर कारवाई झाली आहे. आता रोहित पवार भविष्य सांगण्याची जबाबदारी घेत असतील तर आम्हीही आमच्या भविष्याबद्दल जाणून घेण्यासाठी त्यांच्याकडे जाऊ. सुनील तटकरे म्हणाले की, रोहित पवार यांच्या मताला आम्ही कोणतीही किंमत देत नाही. त्यांच्या दाव्यांना आधार नाही. मावळचे राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांनीही आक्रमक भूमिका घेत रोहित पवारांवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, गेल्या काही महिन्यांपासून रोहित पवार सातत्याने खोटे दावे करत आहेत. प्रसिद्धीसाठी ते जनतेची दिशाभूल करत आहेत. बारामती पोटनिवडणुकीत त्यांनी काँग्रेसचा उमेदवार असावा असा हट्ट धरला होता. ते आम्ही महाराष्ट्राच्या जनतेसमोर सांगावे का? रोहित पवारच २०२९ मध्ये काँग्रेसकडून बारामतीत उभे राहण्याची योजना करत आहेत. हे आम्हाला माहिती आहे, पण आम्ही ते बोलून दाखवत नाही. त्यांनी पक्षात कितीही चलबिचल करण्याचा प्रयत्न केला, तरी काही फरक पडणार नाही. आमच्या पक्षात सर्व काही सुरळीत सुरू आहे.

पण दुसरीकडे राष्ट्रवादीत अंतर्गत संघर्ष आता अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे. प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांची नावे आधी कार्यकारिणीत घेतली नव्हती, आता ती चूक सुधारली असे म्हणत नवे पत्र जारी केले. त्यात दोघांची नावे आहेत, पण त्यांना कोणतीही ठोस जबाबदारी देण्यात आलेली नाही. आता पुन्हा टायपिंग चूक झाली सांगत असले तरी वारंवार हे प्रकार घडत असल्याने नाराजीचीच चर्चा रंगली आहे. पार्थ पवार यांच्या कार्यपद्धतीवरून पक्षात नाराजी वाढत असून, यामुळे वरिष्ठ नेत्यांमधील मतभेद उघड झाले आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून २८ जानेवारी ते १० मार्च या कालावधीत पक्षाकडून झालेला पत्रव्यवहार ग्राह्य धरू नये, अशी विनंती केली होती. या पत्रामुळे १६ फेब्रुवारी रोजी तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी आयोगाला पाठवलेले पत्र रद्द झाले. यानंतर २९ एप्रिल रोजी निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणी यादीवरून वाद अधिकच चिघळला. या यादीत सुनेत्रा पवार यांचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून उल्लेख करण्यात आला. पार्थ पवार यांना सरचिटणीस, तर पान ७ वर

## बारामतीत पुन्हा अपघात! प्रशिक्षण विमानाच्या क्रॅश लँडिंगमुळे खळबळ

■ बारामती

**बारामतीत** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर पुन्हा विमान अपघात झाल्याने खळबळ उडाली. गोजुबावी गावाजवळ आज सकाळी ८.५० वाजताच्या सुमारास रेडबर्ड एव्हिएशनचे प्रशिक्षण विमान कोसळले. या प्रशिक्षण संस्थेच्या या विमानात उड्डाणादरम्यान तांत्रिक बिघाड झाल्यामुळे आपत्कालीन लँडिंगचा प्रयत्न केल्याची माहिती आहे.

कमी उंचीवर उड्डाण करत असताना अचानक नियंत्रणात



बिघाड झाला. लँडिंगच्या प्रयत्नादरम्यान विमानाचा एक भाग रस्त्यालगतच्या वीज खांबाला धडकला आणि त्यानंतर विमान जमिनीवर कोसळले. धडकेनंतर मोठा आवाज झाल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. या विमानात केवळ एक प्रशिक्षणार्थी वैमानिक उपस्थित होता.

## नीट प्रकरणी आणखी तिघे ताब्यात वैद्यकीय संघटनेची सुप्रीम कोर्टात धाव

■ मुंबई

**लाखो** विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या नीट यूजी परीक्षा पेपरफुटीप्रकरणी आज सीबीआयच्या पथकाने अहिल्यानगर, पुणे आणि लातूर येथून आणखी तीन संशयितांना ताब्यात घेतले.

धनंजय लोखंडे आणि मनीषा वाघमारे अशी संशयितांची नावे आहेत. तिसरा संशयीत हा लातूरमधील कोचिंग क्लास चालक आहे. मात्र त्याचे नाव पोलिसांनी उघड केले नाही. धनंजय लोखंडे याला अहिल्यानगरमधून तर मनीषा वाघमारे हिला पुण्यातून ताब्यात घेतले आहे. दुसरीकडे फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशनने (एफएआयएमए) आज सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून नव्याने घेतली जाणार असलेली परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत (एनटीए) न घेता पान ७ वर

## मतीन पटेलच्या घरावर बुलडोझर फिरवला एमआयएम संतप्त! आमच्यासाठी कायदा वेगळा का?

■ छत्रपती संभाजीनगर

**नाशिकमधील** टीसीएस धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याच्या आरोपानंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमचे नारेगावचे नगरसेवक मतीन पटेल यांच्या घर आणि कार्यालयावर महापालिकेने आज सकाळी बुलडोझर फिरवला. या कारवाईनंतर राजकीय वातावरण तापले. एमआयएमचे



प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी संतप्त सवाल केला की, भाजपा कार्यकर्त्यांची बेकायदा घरे पाडली नाहीत, आमच्यासाठी वेगळा कायदा आहे का? मतीन अद्याप दोषी ठरलेले नाही. आम्ही लोकवर्गणीतून पुन्हा त्यांचे घर बांधून देऊ. आजच्या कारवाईवेळी मतीन पटेल यांच्या कुटुंबियांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांचे हार फुले देऊन उपहासात्मक स्वागत केले.

निदा खानला ७ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली होती. मतीन पटेलने तिला पान ७ वर

## सोने-चांदी आणखी महागणार आयात शुल्कात मोठी वाढ

केंद्र सरकारचा निर्णय

■ मुंबई

**सोने** खरेदीला आळा घालण्यासाठी आणि रुपयाची घसरण रोखण्यासाठी केंद्र सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ केली आहे. सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांपर्यंत वाढवले असून हा निर्णय मंगळवार मध्यरात्रीपासून लागू करण्यात आला आहे.

नव्या रचनेनुसार सरकारने १० टक्के मूळ सीमाशुल्क आणि ५ टक्के कृषी आणि पायाभूत सुविधा विकास अधिभार लागू केला आहे. त्यामुळे परदेशातून सोने-चांदी आणणे आता अधिक महाग होणार आहे. याचा थेट परिणाम देशातील सराफा बाजारावर होण्याची शक्यता आहे. सोने खरेदीसाठी ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागतील. डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत कमी झाल्याने परदेशातून सोने आणणे आणखी महाग झाले आहे. सोन्या चांदीवर कर वाढवल्यास अधिकृत मार्गाने होणारी आयात कमी होऊन पुन्हा सोन्याच्या तस्करीला चालना मिळू शकते, अशी भीती एका सोन्याच्या व्यापाऱ्याने व्यक्त केली.

## एटीएसचे राज्यभर छापे! पाक गँगस्टर शहजाद भट्टीच्या संपर्कातील तरुण रडारवर

■ मुंबई

**महाराष्ट्र** दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) राज्यभरात मोठी कारवाई करत अनेक शहरांमध्ये एकाचवेळी छापे टाकले आहेत. पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी याच्या नेटवर्कविरोधात ही मोहीम राबवण्यात येत असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतीय तरुणांना जाळ्यात ओढण्याच्या प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

मुंबई, पुणे, नालासोपारा, मिरारोड, नागपूर, अकोला, नांदेड, नाशिक आणि




जळगाव या शहरांमध्ये सकाळपासून छापे टाकले. भट्टी किंवा त्याच्या तथाकथित 'डोगर गँग'शी संपर्कात असलेल्या संशयितांची माहिती गोळा केली जात असून, त्यांच्या सोशल मीडिया खात्यांची आणि डिजिटल व्यवहारांची तपासणी केली जात आहे. तपास यंत्रणांच्या प्राथमिक माहितीनुसार, शहजाद भट्टी हा पाकिस्तानातील लाहोरचा रहिवासी असून, सध्या दुबईतून आपले नेटवर्क चालवत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतातील तरुणांशी संपर्क साधून त्यांना कट्टरतावाद, हेरगिरी किंवा पान ७ वर

## कामाच्या ताणामुळे झोप लागत नाही अमिताभ यांचा ब्लॉगमध्ये खुलासा

■ मुंबई



**बॉलिवूडचे** ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनी आपल्या ब्लॉगमधून कामाच्या ताणामुळे झोपेवर परिणाम होत असल्याची मनमोकळी कबुली दिली. कामाच्या जबाबदाऱ्या आणि व्यस्त वेळापत्रकामुळे अनेकदा रात्री उशिरापर्यंत जागे राहावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. अमिताभ बच्चन यांनी ब्लॉगमध्ये लिहिले की, काम झोपेपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. वैद्यकीय शास्त्र म्हणते की, हे योग्य नाही आणि कमीतकमी ७ तास झोप घेतली पाहिजे. कारण शरीर झोपेच्या तासांमध्येच विकसित होते आणि दुरुस्त होते. तर अशा परिस्थितीत कोणी काय करावे? झोप न लागल्यास शांततेसाठी संगीताचा आधार वाटतो. स्लाईड गिटार आणि सतारवरील संथ शास्त्रीय संगीत त्यांना मानसिक शांतता देते. संगीत हे आत्म्याला शांत करणारे माध्यम असून, ते मनाला सकारात्मक ऊर्जा देते. संगीत एक असा अदृश्य धागा सांगितले जो मानवी आत्म्याला देवाशी जोडतो. संगीताचे सात सूर संपूर्ण जगाला एकमेकांशी जोडतात.

## तामिळनाडूत थलापती विजय यांना पूर्ण पाठिंबा विश्वासदर्शक ठराव जिंकला! विरोधात २२ मते

**तामिळनाडूमध्ये नवनिर्वाचित मुख्यमंत्री थलापती विजय यांच्या टीव्हीके पक्षाने सरकारवरील विश्वासदर्शक ठराव जिंकला. महत्त्वाची बाब म्हणजे अण्णा द्रमुकमधून फुटून बाहेर पडलेल्या २५ आमदारांनी सरकारच्या बाजूने मतदान केले. त्या जोरावर विजय यांनी विश्वासदर्शक ठराव १४४ विरूद्ध २२ अशा दणदणीत फरकाने जिंकला. २२ आमदारांनी ठरावाच्या विरोधात मतदान केले. तर भाजपाचा एक आणि पीएमके पक्षाचे चार अशा एकूण पाच आमदारांनी मतदानावर बहिष्कार टाकत सभात्याग केला.**

■ चेन्नई

२३४ **सदस्यांच्या** तामिळनाडू विधानसभेत सर्वाधिक ११८ जागा



जिंकून विजय यांचा टीव्हीके पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरला होता. मात्र बहुमतासाठी ११८ आमदारांची आवश्यकता होती. सर्वप्रथम काँग्रेसने टीव्हीकेला पाठिंबा जाहीर केला. काँग्रेसकडे पाच आमदार आहेत. तरीही बहुमताचा आकडा गाठता येत नव्हता. त्यामुळे विजय सरकार स्थापन करण्यास असमर्थ ठरत होते. अखेर भाकपा आणि माकपा या दोन डाव्या पक्षांनी पान ७ वर

## रेल्वे भरती मारहाण प्रकरण माझा संबंध नाही! राज ठाकरेंचा जबाब

■ ठाणे

**मनसे** प्रमुख राज ठाकरे यांनी २००८ मधील रेल्वे भरती आंदोलन प्रकरणी आज ठाणे न्यायालयात हजेरी लावत या गुन्ह्याशी माझा काहीही संबंध नसल्याचा दावा केला. कल्याण रेल्वे स्थानकावर उत्तर भारतीय परीक्षार्थींवर झालेला हल्ला आणि रेल्वे मालमत्तेच्या नुकसानीप्रकरणी सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयात त्यांचा जबाब नोंदवला. या प्रकरणात राज ठाकरे यांच्यासह एकूण सातजण आरोपी आहेत.

आज ठाणे न्यायालयात झालेल्या सुनावणीत न्यायाधीशांनी या प्रकरणातील साक्षीदारांचे जबाब आणि आरोपपत्रातील तपशील वाचून दाखवले. उत्तर भारतीय परीक्षार्थींना मारहाण झाली, त्यात काही जण जखमी झाले आणि आंदोलनादरम्यान हिंसाचार झाला, असे मुद्दे न्यायालयात मांडण्यात आले. राज ठाकरे पान ७ वर

## अखिलेश यादव यांचे सावत्र बंधू प्रतीक यादव यांचे निधन



■ लखनौ

### शरीरावर काळे-निळे डाग

**समाजवादी** पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांचे सावत्र बंधू प्रतीक यादव (३८) यांचे आज पहाटे लखनौ येथे घरी निधन झाले. सकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास त्यांना सिव्हिल रुग्णालयात आणले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

प्रतीक यादव हे समाजवादी पक्षाचे दिवंगत संस्थापक मुलायम सिंह यादव यांचे धाकटे चिरंजीव आहेत तर भाजपा नेत्या अपर्णा यादव याचे पती आहेत. गेल्या काही

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

दिवसांपासून प्रतीक यादव यांची प्रकृती बिघडलेली होती. ते डिप्रेशनमध्ये होते. ३० एप्रिलला त्यांना मेदांता रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर प्रकृतीत सुधारणा झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले होते. मात्र, आज ते घरात स्वयंपाकघरात बेशुद्ध अवस्थेत पडलेले आढळले. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सरकारी रुग्णालयात आठ डॉक्टरांच्या पथकाने शवविच्छेदन केले. प्राथमिक माहितीनुसार कोणताही घातपात पान ७ वर

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

कुर्ला ते ठाणे / नवीमुंबई एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **7208993036** {NC260483}

10/ 24 तास होम पेशंट ड्युटीसाठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला PER DAY. **9372767739 / 8452061740** {NC260458}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, ड्रायव्हर, पेशंटकेअर (MALE + FEMALE) पाहिजेत. (राहणेखाणे + पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे. **9136404828** {NC260489}

प्रिंटींग प्रेसमध्ये कोमोरी मशीन LS 429 with UV कोटरसाठी प्रिंटर, फिडरमन आणि बॉयलर पाहिजेत. महापे, नवीमुंबई. **9820614018** {NC260506}

स्त्री-पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजे. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा- **7040206848** {NC260438}

मालाड / गोरेगाव पूर्व येथे हाऊसकिपिंग स्टाफची भरती चालू आहे. पगार- १५,०००/- , पीएफ, ईएसआयसी, बोनस व साप्ताहिक सुट्टी संपर्कः- **9833557505 / 8693055930** {NC260500}

घर कामासाठी बाई पाहिजे आहे लोढा, अप्पर ठाणे, डोंबिवली (वेस्ट), संपर्क : **8169837819** {NC260525}

४ कलर ऑफसेट प्रिंटिंगकरिता ऑपरेटर पाहिजे. संपर्क- सह्याद्री ऑफसेट पणजी, गोवा. मो.नं.- **9860897379** {NC260530}

Offset Printing Press मध्ये Printer Cutting Binder, Punching operator, Boiler पाहिजे (भायखळा)- **9820080776 / 9819551478** {NC260540}

कटींग मशिन बाईंडर, ऑफसेट प्रिंटर आणि फिडरमेन बोईलर पाहिजेत. गोरेगांव ईस्ट. संपर्कः **9987049101** {NC260533}

## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी "बायका/ मुली" पाहिजेत पगार- 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC260403}

सिक्युरिटी हाऊसकिपिंग कंपनीला-सेल्स / मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, ॲडमिन, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायजर, हाऊसकिपिंग मुले / मुली पाहिजेत- **9223380569/68** {NC260492}

मुंबईत हेल्थ सर्वेसाठी भरती! मुले, मुली, महिला. वय 18-40. पगार ₹15,000+ रेल्वे पास. संपर्कः **9223269345** {NC260503}

दादरयेथे 12 तास ड्युटीसाठी Male वॉचमन/ सिक्युरीटी गार्ड पाहिजेत. वय-60 च्या आत. **8879659774/ 9869278658** {NC260542}

वैद्य ॲक्टीवा ट्रेनिंग स्कुलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत. चर्नीरोड (पुर्व). रु.11,000. **9004262658** {NC260543}

## गुंतवणूकविषयक

फक्त ६ महिन्यात घर, लग्न, कामाच्या (पैशाच्या) समस्या सोडविणारे जीवन विमा गुंतवणूक मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC260344}

## जागाविषयक

रो-हाऊस प्लॉट १ गुंठा ६ लाख, ६० मीटर-३ लाख, विकणे आहे. MMRDA 3.0 री महामुंबई पासून ५ किलोमीटर अंतरावर, रोड टच, प्राईम लोकेशन लोढा ग्रुप / हिरानंदानी प्रोजेक्ट जवळ संपर्कः- **9920887465 / 8828987465** {NC260478}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3,000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9076403434 / 8652643434** {NC260411}

## फिल्मविषयक

महेश्वर फिल्म्स इंटरनॅशनल आगामी मराठी, हिंदी फिल्म सीरिअल, एल्बमसाठी सर्व वयोगटातील नवीन कलाकारांसाठी योग्यते अनुसार मौका (ऑडिशन / ट्रेनिंग) : **9136034519 / 8369152017** {NC260495}

## वृद्धाश्रम

चांगले, आजारी, सिझोफेनिया, डेमनशिया, मनोरुग्ण, कोमात असलेले, मुले-मुली, वृद्धांसाठी तात्पुरते, शेवटपर्यंत औषध. उपचारासह संगोपन. घरी घेऊन जाण्यासाठी येतो. **9082356927** {NC260541}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

## भुवनमध्ये पाणीटंचाई नागरिकांची वणवण

■ मुरबाड

**मुरबाड** तालुक्यातील भुवन गावात खाजगी विहिरी, अनेक बोअरवेल असताना गावातील इतर नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. लाखो रुपये खर्चून गावातील नळपाणी पुरवठा योजना बंद असल्याने गावातील सधन कुटुंबांनी स्वतः खर्च करून बोअरवेल मारून पाणी टंचाईवर मात केली. मात्र ज्यांची आर्थिक स्थिती नीट नाही त्यांना सार्वजनिक पाण्याच्या व्यवस्थेवर अवलंबून रहावे लागत आहे. गावातील ८० टक्के लोकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.


सध्या या गावात दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केल्याचे पंचायत समिती मुरबाडकडून सांगण्यात आले आहे. मात्र लाखो रुपये खर्चून गावाला पाणी मिळत नसल्याने या योजनेची चौकशी करून गाव टंचाईमुक्त करण्याची मागणी होत आहे.



## आजचे राशी भविष्य


गुरुवार ता. १४ मे २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

**मेष**  नकारार्थी विचार दूर ठेवा. उत्साही व आशावादी दृष्टीकोन अनुकूलता वाढवेल. भावंडांशी मतभेद संभवतात.

**वृषभ**  आनंदी दिवस. इच्छा पूर्ण होतील. आनंदवार्ता मिळेल. बोलण्यातून गैरसमज संभवतो. सावध राहा.

**मिथुन**  फायदेशीर दिवस. चांगल्या संधी येतील. कुटुंबात शांतता आणि एकोपा राहील.

**कर्क**  कामाच्या ठिकाणी बदलांना सामोरे जावे लागेल. प्रवासही भरपूर होईल. दगदगीने तब्येतीवर ताण येईल.

**सिंह**  नशीबाची साथ नसल्याने आज महत्त्वाचे निर्णय घेणे टाळा. कष्ट आणि जबाबदाऱ्या वाढणार आहेत. वरिष्ठांशी मतभेद संभवतात.

**कन्या**  नियोजनबद्ध रीतीने कामे करणे महत्त्वाचे राहील. पैशाचे व्यवहार सावधपणे करा. कौटुंबिक तडजोड करावी लागेल.

**तूळ**  ताठरपणा टाळल्यास सफलता मिळवता येईल. कार्यक्षेत्रात अनेक नवीन संधी मिळतील. मित्र, सहकारी यांच्याबरोबर सुसंवाद राहील.

**वृश्चिक**  कौटुंबिक प्रगतीसाठी पावले उचलण्यास आजचा दिवस योग्य राहील. वडिलधाऱ्यांचा पाठिंबा मिळेल. कामात यश.

**धनु**  नातलग व मित्रमंडळींशी चांगले संबंध राखणे फायद्याचे ठरेल. कौटुंबिक वादविवाद त्रस्त करतील. अनपेक्षित धनलाभाची शक्यता.

**मकर**  महत्त्वाचे निर्णय घेण्यास मनस्थिती अनुकूल राहील. नियोजित कामे वेळेत पूर्ण होतील. वरिष्ठांची शाबासकी मिळेल.

**कुंभ**  कौटुंबिक प्रगतीबाबत विचार मनात घोळत राहतील. तणावामुळे कामाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता. तब्येतीकडे लक्ष द्या.

**मीन**  अतिविचार मानसिक गोंधळ वाढवणारा ठरेल. कौटुंबिक प्रश्नावरून अनावश्यक वादाची शक्यता. नेत्रविकारापासून जपा.

## शुभ राशी ता. १४/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | ३ | ८ |
| १४ | ३४ | ८४ |
| १९ | ३९ | ८९ |
| १२८ | १४८ | ३५० |
| ३८० | २४७ | ४६८ |

# १४ खरीप पिकांची किमान आधारभूत किंमत वाढवली

**केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती**

■ नवी दिल्ली

**सार्वजनिक-** खासगी भागीदारी (पीपीपी) अंतर्गत दीर्घकालीन परवान्याद्वारे नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या श्रेणीवाढीला आणि आधुनिकीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली. त्यासोबत १४ खरीप पिकांची किमान आधारभूत किंमत (एमएसपी) वाढवल्या आहेत. त्यासाठी आता शेतकऱ्यांना २,६०,००० कोटी रुपये मिळणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दुपारी पत्रकार परिषदेत दिली.

अश्विनी वैष्णव म्हणाले की, कोळसा वायूकरण योजनेसाठी ३७,५०० कोटी रुपयांना मंजुरी दिली. केंद्राचे २०३० पर्यंत कोळशापासून १० कोटी टन वायू उत्पादन करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. गुजरातमधील सरखेज आणि धोलेरादरम्यानच्या सेमी-हाय-स्पीड ट्रेनच्या दुहेरी मार्गासाठी २०,६६७ कोटी रुपयांना मंजुरी दिली. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर अहमदाबाद आणि धोलेरादरम्यानची कनेक्टिव्हिटी सुधारणार आहे. धोलेरा येथील आगामी विमानतळावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाही याचा फायदा होईल. हा मार्ग २०३०-३१ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.

# राष्ट्रवादीच्या महिला नेत्या बाविस्कर यांच्या कारवर धुळ्यात हल्ला



■ धुळे

**धुळे** जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या महिला नेत्या रिता बाविस्कर यांच्या वाहनावर पहाटे हल्ला झाला. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. हा गोरक्षकांनी हल्ला केल्याचा आरोप असून, या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करून दोन जणांना अटक केली.

रिता बाविस्कर या अंमळनेरहून धुळ्याकडे वाहनाने प्रवास करत होत्या. पहाटे तीन वाजताच्या सुमारास धुळे तालुक्यातील वणी गावाजवळ काही जणांनी त्यांचे वाहन अडवण्याचा प्रयत्न केला. वाहनातून गोवंशाची तस्करी होत असल्याच्या संशयावरून गोरक्षकांनी लोखंडी खिळे असलेला रॉड रस्त्यावर टाकून गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला. या घटनेत रिता बाविस्कर थोडक्यात बचावल्या. घटनेनंतर त्यांनी धुळे तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. काही दिवसांपूर्वी शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर शाईफेक झाल्याची घटना घडली होती.

# अमूल, मदरडेअरीच्या दुधात २ रुपयांची वाढ

**मुंबई** - अमूल आणि मदर डेअरीने दुधाच्या दरामध्ये प्रति लीटर २ रुपयांची वाढ करण्याची घोषणा केली आहे. ही दरवाढ उद्यापासून संपूर्ण देशभरामध्ये लागू होणार आहे. देशातील दोन आघाडीच्या कंपन्यांनी दुधाचा भाव वाढवल्याने महागाईने होरपळलेल्या जनतेला चहा पिणेही अवघड होणार आहे.

मदर डेअरीने परिपत्रक जारी करत स्पष्ट केले की, गेल्या वर्षात शेतकऱ्यांकडून दूध खरेदी करण्याच्या दरामध्ये ६ टक्के वाढ



झाली असून, ग्राहकांवरील भार कमी करण्याचे सर्व प्रयत्न करून ही दरवाढ करणे भाग आहे.

# काळ्या यादीतील कंत्राटदाराला पालिकेचे व्हिडिओ वॉलचे काम

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षात उभारण्यात आलेल्या व्हिडिओ वॉलची दुरवस्था झाली असून, ती कधीही कोसळण्याच्या स्थितीत असल्याचा मुद्दा स्थायी समितीच्या बैठकीत गाजला.

या व्हिडिओ वॉलच्या नव्या कामासाठी काळ्या यादीतील कंत्राटदाराला संधी दिली जात असल्याचा आरोप करत सभागृह नेते गणेश खणकर यांनी प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्याची उपसूचना मांडली. मुंबईतील विविध भागांवर लक्ष ठेवण्यासाठी नियंत्रण कक्षात मोठी व्हिडिओ वॉल उभारण्याचा प्रस्ताव प्रशासनाने आणला होता. मात्र ठराविक कंपन्यांना लाभ मिळावा म्हणूनच हा प्रस्ताव आणला जात असल्याचा संशय सदस्यांनी व्यक्त केला. सदस्यांचा वाढता रोष लक्षात घेऊन स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. यावेळी सदस्य प्रिती साटम यांनीही प्रशासनावर टीका करत, पावसाळा तोंडावर आला असताना काळ्या यादीतील कंत्राटदाराला काम देण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे संबंधितांना लाभ मिळवून देण्याचा घाट घातला जात आहे, असा आरोप केला. काँग्रेसचे गटनेते आश्रफ आजमी यांनीही या प्रस्तावावर प्रश्न उपस्थित करत, २२ टक्के कमी दराने काम देण्याचा प्रस्ताव आहे. कंत्राटदार नेमका कोणता पुरवठा करणार याची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली. मुंबई महापालिकेच्या मुख्यालयातील मुख्य नियंत्रण कक्ष आणि परळ येथील पर्यायी नियंत्रण कक्षात २०१६ मध्ये व्हिडीओ वॉल बसवण्यात आली होती. या व्हिडीओ वॉलच्या माध्यमातून मुंबईतील सुमारे ९ हजार ७०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे प्रक्षेपण पाहिले जाते.

# हडपसरमध्ये रुग्णालयाजवळ जिवंत बॉम्ब आढळला

■ पुणे

**पुण्याच्या** हडपसर परिसरातील कामधेनू स्टेटसमधील एका नामांकित रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर जिवंत बॉम्ब सापडल्यामुळे एकच खळबळ उडाली. या बॉम्बमध्ये ७ तासांचा वेळ सेट होती. याप्रकरणी पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. रुग्णालयासमोर बॉम्ब आढळल्यानंतर पोलिसांनी परिसर रिकामी करून वेढा घातला आणि नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले. अग्निशमन दलाच्या गाड्याही घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. बॉम्बशोधक पथकाने अत्यंत काळजीपूर्वक बॉम्ब ताब्यात घेतला. हा बॉम्ब मोकळ्या जागेत नेण्यात आला. तिची तपासणी व निष्क्रिय करण्याचे काम सुरू करण्यात आले. त्यात बॉम्बशोधक पथकाला यश आले. पोलीस आणि संबंधित यंत्रणा सीसीटीव्ही फुटेज, हॉस्पिटलमधील ये-जा करणाऱ्या व्यक्तींची माहिती आणि इतर तांत्रिक तपासाच्या आधारे संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत.

# सिडकोच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्याला अटक

**नवी मुंबई** - नवी मुंबईतील सिडकोचे भूमी व भूमापन मुख्य अधिकारी आणि अप्पर जिल्हाधिकारी रामदास हरिभाऊ जगताप यांना सिडको कार्यालयातच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २२,५०० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक केली. २२.५ टक्के योजनेतील रजिस्ट्रेशन प्रकरणात ही कारवाई केली. जगताप यांच्या सूचनेनुसार शिपाई हरेश सोनवणेने रक्कम स्वीकारत असताना ही कारवाई करण्यात आली आहे. जगताप आणि हरेश सोनवणे या दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली असून, त्यानंतर त्यांची चौकशी सुरू केली आहे. या कारवाईमुळे नवी मुंबईच्या सिडकोमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

# विधान परिषदेच्या दहा सदस्यांचा आज शपथविधी

■ मुंबई

**महाराष्ट्र** विधान परिषदेच्या १० नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी समारंभ उद्या सकाळी ११ वाजता विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात पार पडणार आहे. विधानसभा सदस्यांद्वारे झालेल्या द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या ९ सदस्यांसह पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या एका सदस्याचा यात समावेश आहे. या सर्व सदस्यांना विधान परिषदेचे सभापती राम शिंदे सदस्यत्वाची शपथ देणार आहेत. शपथ घेणाऱ्या सदस्यांमध्ये डॉ.नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, अंबादास दानवे, प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, झीशान सिद्दीकी, माधवी नाईक, सुनिल कर्जतकर, विवेक कोल्हे आणि संजय भेंडे यांचा समावेश आहे. या समारंभाला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# १९७१ च्या युद्धात पाकिस्तानपेक्षा भारताचे नुकसान अधिक झाले होते

**माजी लष्करप्रमुख नरवणेंची माहिती**

■ मुंबई

**१९७१ च्या** भारत-पाक युद्धात पाकिस्तानपेक्षा भारताचे नुकसान अधिक झाले होते, अशी माहिती माजी लष्करप्रमुख जनरल एम. एम. नरवणे यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात बोलताना दिली. याप्रसंगी त्यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत भारताच्या लष्करी धोरणावरही भाष्य केले. ऑपरेशन सिंदूरमागे स्पष्ट राजकीय-लष्करी उद्दिष्टे होती आणि संघर्ष कधी व कसा थांबवायचा याबाबत भारताला पूर्ण स्पष्टता होती, असे नरवणे म्हणाले.

एम.एम.नरवणे म्हणाले की,१९७१ च्या भारत-पाक युद्धावेळी मी ११ वर्षाचा होतो. माझे वडील दिल्लीत एअर हेडकॉर्टरमध्ये पोस्टेड होते. दररोज सकाळी उत्सुकतेने पाकिस्तानचे किती नुकसान झाले, किती विमाने पडली, किती भाग आपण ताब्यात घेतला, हे जाणून घेण्यासाठी मी वर्तमानपत्र वाचायचो. तेव्हा माझे वडील सांगायचे की, तू जे वर्तमानपत्रात वाचत आहेस ते पाकिस्तानचे अर्धे कर आणि भारताचे दुप्पट कर म्हणजे खरे नुकसान समजेल. मला वाटते की, माझ्या वडिलांचे सांगणे आजसुद्धा तितकेच खरे आहे.

ते पुढे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर मोहिमेमागे स्पष्ट राजकीय आणि लष्करी उद्दिष्टे होती. भारताने संघर्ष कधी आणि कसा थांबवायचा याबाबत आधीपासूनच स्पष्टता ठेवली होती. त्यांच्या मते युद्ध ही कोणत्याही चित्रपटासारखी साधी प्रक्रिया नसून ती अत्यंत गुंतागुंतीची आणि परिस्थितीनुसार बदलणारी असते. पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचा प्रस्ताव आल्यावरही भारताकडे पुढील कारवाईची क्षमता होती. मात्र देशाने संयम दाखवत संघर्ष थांबवण्याचा निर्णय घेतला.

# १५ डबा लोकलच्या २० फेऱ्या वाढवणार! मध्य रेल्वेचा निर्णय

■ मुंबई

**मध्य** रेल्वे प्रशासनाने लोकलमधील वाढती गर्दी कमी करण्यासाठी मोठे पाऊल उचलले असून येत्या दोन महिन्यांत १५ डबा लोकलच्या २० जलद फेऱ्या वाढवण्याचे नियोजन केले आहे. यासाठी प्लॅटफॉर्म विस्तारीकरणाची कामे वेगाने सुरू असून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कसारा आणि कर्जत दरम्यानच्या स्थानकांवर काम सुरू आहे.

जलद मार्गावरील एकूण ३७ स्थानकांवर प्लॅटफॉर्म विस्ताराचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी बहुतांश काम पूर्ण झाले असून केवळ ५ स्थानकांवरील काम बाकी आहे. विशेषतः टिटवाळा रेल्वे स्थानक येथील काम पूर्ण होताच दोन १५ डबा लोकल (रेक) सेवेत दाखल करण्यात येणार आहेत. या दोन रेकच्या मदतीने दररोज २० जलद फेऱ्या वाढवण्यात येणार असून त्यामुळे प्रवाशांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत दर बुधवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 19 | सोडत दिनांक 13/05/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख: **AK-05 : 6204**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी): **6204** — महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर; श्री अष्टविनायक लॉटरी - औरंगाबाद

दुसरे बक्षिस रु. 5000/-: **4596** — श्री अष्टविनायक लॉटरी - औरंगाबाद; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2881 | 3402 | 3698 | 3940 | 4773 | 5216 | 5974 | 6920 | 7293 | 8972 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1217 | 1478 | 3895 | 3985 | 4339 | 4613 | 5092 | 6836 | 8019 | 9359 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0053 | 1919 | 1936 | 2590 | 4160 | 6637 | 7043 | 7415 | 8798 | 9783 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2607 | 2674 | 2986 | 3956 | 4737 | 5176 | 7283 | 7358 | 7738 | 9832 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1129 | 1792 | 2814 | 3358 | 4241 | 4848 | 5552 | 6439 | 7071 | 7783 | 8626 | 9317 |
| | | 1134 | 1821 | 2842 | 3362 | 4249 | 4852 | 5553 | 6462 | 7078 | 7799 | 8645 | 9322 |
| | | 1138 | 1851 | 2848 | 3372 | 4253 | 4871 | 5563 | 6465 | 7137 | 7827 | 8676 | 9325 |
| | | 1139 | 1924 | 2864 | 3377 | 4264 | 4933 | 5565 | 6468 | 7172 | 7852 | 8688 | 9379 |
| | | 1146 | 2022 | 2912 | 3378 | 4338 | 4954 | 5568 | 6491 | 7189 | 7859 | 8717 | 9386 |
| 0000 | 0521 | 1151 | 2032 | 2922 | 3385 | 4344 | 4967 | 5589 | 6496 | 7219 | 7913 | 8725 | 9392 |
| 0003 | 0530 | 1154 | 2041 | 2924 | 3432 | 4358 | 4993 | 5597 | 6533 | 7228 | 7933 | 8731 | 9409 |
| 0005 | 0535 | 1172 | 2052 | 2925 | 3447 | 4360 | 5018 | 5605 | 6562 | 7230 | 7954 | 8753 | 9410 |
| 0008 | 0585 | 1174 | 2066 | 2939 | 3453 | 4372 | 5025 | 5613 | 6565 | 7247 | 7970 | 8772 | 9425 |
| 0016 | 0609 | 1184 | 2079 | 2945 | 3457 | 4391 | 5029 | 5654 | 6572 | 7258 | 8049 | 8781 | 9436 |
| 0019 | 0640 | 1188 | 2117 | 2948 | 3462 | 4416 | 5050 | 5673 | 6591 | 7262 | 8068 | 8787 | 9481 |
| 0027 | 0649 | 1209 | 2153 | 2974 | 3473 | 4423 | 5058 | 5699 | 6605 | 7283 | 8083 | 8788 | 9498 |
| 0037 | 0675 | 1213 | 2172 | 2984 | 3532 | 4424 | 5093 | 5728 | 6607 | 7313 | 8089 | 8789 | 9499 |
| 0044 | 0690 | 1218 | 2192 | 2992 | 3565 | 4446 | 5114 | 5805 | 6616 | 7323 | 8105 | 8792 | 9500 |
| 0048 | 0703 | 1224 | 2204 | 3034 | 3578 | 4447 | 5125 | 5837 | 6623 | 7345 | 8108 | 8807 | 9531 |
| 0049 | 0705 | 1247 | 2206 | 3036 | 3582 | 4459 | 5176 | 5915 | 6624 | 7382 | 8169 | 8808 | 9562 |
| 0057 | 0769 | 1255 | 2209 | 3059 | 3633 | 4470 | 5184 | 5918 | 6635 | 7400 | 8173 | 8813 | 9582 |
| 0062 | 0772 | 1280 | 2250 | 3088 | 3635 | 4471 | 5235 | 5943 | 6649 | 7409 | 8185 | 8818 | 9607 |
| 0065 | 0806 | 1284 | 2307 | 3096 | 3668 | 4492 | 5244 | 5958 | 6656 | 7470 | 8204 | 8860 | 9609 |
| 0082 | 0848 | 1314 | 2324 | 3110 | 3681 | 4496 | 5259 | 5963 | 6659 | 7475 | 8207 | 8885 | 9619 |
| 0092 | 0861 | 1358 | 2328 | 3113 | 3696 | 4508 | 5286 | 5978 | 6663 | 7478 | 8219 | 8890 | 9684 |
| 0098 | 0884 | 1364 | 2357 | 3124 | 3718 | 4514 | 5288 | 6009 | 6668 | 7479 | 8268 | 8899 | 9734 |
| 0110 | 0895 | 1383 | 2381 | 3142 | 3742 | 4539 | 5326 | 6038 | 6670 | 7505 | 8281 | 8917 | 9761 |
| 0229 | 0902 | 1391 | 2384 | 3168 | 3785 | 4540 | 5327 | 6045 | 6685 | 7531 | 8322 | 8936 | 9768 |
| 0253 | 0903 | 1392 | 2429 | 3170 | 3799 | 4570 | 5335 | 6047 | 6692 | 7567 | 8331 | 9003 | 9799 |
| 0261 | 0906 | 1410 | 2519 | 3210 | 3801 | 4574 | 5355 | 6067 | 6715 | 7637 | 8332 | 9004 | 9839 |
| 0268 | 0909 | 1418 | 2521 | 3234 | 3818 | 4601 | 5357 | 6069 | 6745 | 7646 | 8432 | 9019 | 9858 |
| 0278 | 0954 | 1423 | 2543 | 3253 | 3862 | 4629 | 5363 | 6100 | 6749 | 7662 | 8464 | 9024 | 9909 |
| 0290 | 0963 | 1449 | 2573 | 3264 | 3899 | 4656 | 5377 | 6114 | 6766 | 7699 | 8478 | 9026 | 9912 |
| 0307 | 0972 | 1452 | 2581 | 3271 | 3907 | 4707 | 5407 | 6115 | 6795 | 7710 | 8484 | 9102 | 9916 |
| 0308 | 0973 | 1459 | 2622 | 3273 | 3913 | 4714 | 5417 | 6155 | 6846 | 7741 | 8496 | 9119 | 9922 |
| 0309 | 1012 | 1553 | 2623 | 3303 | 3933 | 4719 | 5438 | 6160 | 6869 | 7745 | 8497 | 9190 | 9926 |
| 0312 | 1016 | 1572 | 2631 | 3310 | 4010 | 4740 | 5513 | 6162 | 6883 | 7746 | 8514 | 9192 | 9930 |
| 0316 | 1021 | 1601 | 2657 | 3315 | 4045 | 4764 | 5514 | 6171 | 6887 | 7752 | 8518 | 9197 | 9946 |
| 0317 | 1035 | 1618 | 2723 | 3327 | 4049 | 4768 | 5516 | 6187 | 6897 | 7756 | 8519 | 9199 | 9952 |
| 0387 | 1061 | 1661 | 2742 | 3331 | 4096 | 4782 | 5522 | 6212 | 6945 | 7758 | 8580 | 9207 | 9955 |
| 0390 | 1101 | 1664 | 2762 | 3333 | 4114 | 4784 | 5536 | 6261 | 6964 | 7766 | 8584 | 9219 | 9974 |
| 0405 | 1116 | 1668 | 2767 | 3341 | 4131 | 4786 | 5545 | 6279 | 6965 | 7769 | 8595 | 9232 | 9988 |
| 0489 | 1122 | 1678 | 2780 | 3346 | 4153 | 4791 | 5549 | 6378 | 6982 | 7770 | 8598 | 9270 | 9997 |
| 0507 | 1124 | 1776 | 2787 | 3347 | 4199 | 4806 | 5551 | 6407 | 7067 | 7780 | 8622 | 9298 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 19 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 13/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/-: **SV-00 : 5318**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0073 | 0862 | 1110 | 1461 | 2003 | 2795 | 4013 | 5256 | 5361 | 7717 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1957 | 3590 | 3945 | 5814 | 6147 | 7563 | 7597 | 8319 | 9833 | 9999 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0203 | 1383 | 2284 | 2370 | 3026 | 3206 | 4194 | 4715 | 7833 | 8802 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1116 | 1987 | 2832 | 4631 | 5951 | 6827 | 8087 | 9053 |
| | 1126 | 2029 | 2923 | 4653 | 5955 | 6840 | 8248 | 9111 |
| 0036 | 1172 | 2065 | 3223 | 4700 | 5956 | 6917 | 8271 | 9114 |
| 0062 | 1185 | 2091 | 3281 | 4975 | 6086 | 6967 | 8288 | 9116 |
| 0260 | 1222 | 2264 | 3309 | 5299 | 6180 | 7032 | 8314 | 9158 |
| 0296 | 1223 | 2298 | 3338 | 5358 | 6340 | 7278 | 8358 | 9195 |
| 0407 | 1541 | 2376 | 3443 | 5543 | 6342 | 7473 | 8396 | 9213 |
| 0483 | 1573 | 2416 | 3783 | 5559 | 6435 | 7626 | 8442 | 9666 |
| 0552 | 1612 | 2461 | 3995 | 5582 | 6446 | 7654 | 8568 | 9721 |
| 0574 | 1634 | 2632 | 4084 | 5590 | 6464 | 7757 | 8643 | 9749 |
| 0876 | 1825 | 2658 | 4132 | 5605 | 6506 | 8011 | 8820 | 9816 |
| 0906 | 1861 | 2703 | 4179 | 5665 | 6606 | 8048 | 8875 | 9925 |
| 1105 | 1918 | 2722 | 4542 | 5900 | 6742 | 8081 | 8877 | 9944 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 19 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 13/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/-: **MG-06 : 9658** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/-: **1967**

तिसरे बक्षिस रु. 2000/-: **6064** — अंबिका एजन्सी, दादर, मुंबई

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0649 | 1283 | 1830 | 2161 | 2247 | 2968 | 5745 | 7064 | 8951 | 9069 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0359 | 3026 | 4885 | 5324 | 5379 | 7159 | 8003 | 8136 | 8546 | 9598 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1715 | 2793 | 2799 | 3175 | 4729 | 6387 | 8057 | 8091 | 9015 | 9917 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1315 | 2396 | 3516 | 4322 | 5502 | 6463 | 7371 | 8172 | 9047 |
| | | 1390 | 2421 | 3523 | 4434 | 5506 | 6467 | 7379 | 8177 | 9057 |
| | | 1408 | 2522 | 3618 | 4445 | 5507 | 6528 | 7397 | 8250 | 9095 |
| 0000 | 0456 | 1442 | 2612 | 3627 | 4723 | 5522 | 6568 | 7417 | 8268 | 9199 |
| 0006 | 0458 | 1614 | 2638 | 3664 | 4774 | 5563 | 6616 | 7429 | 8297 | 9219 |
| 0053 | 0535 | 1701 | 2642 | 3678 | 4847 | 5586 | 6625 | 7478 | 8597 | 9234 |
| 0075 | 0595 | 1707 | 2761 | 3694 | 4987 | 5618 | 6631 | 7563 | 8601 | 9269 |
| 0080 | 0602 | 1721 | 2807 | 3730 | 5071 | 5631 | 6693 | 7677 | 8618 | 9274 |
| 0087 | 0606 | 1726 | 2869 | 3732 | 5097 | 5828 | 6754 | 7708 | 8668 | 9373 |
| 0104 | 0667 | 1728 | 2941 | 3823 | 5152 | 5846 | 6809 | 7742 | 8674 | 9609 |
| 0128 | 0700 | 1735 | 2995 | 3832 | 5175 | 5884 | 6828 | 7750 | 8680 | 9689 |
| 0153 | 0806 | 1761 | 3015 | 3873 | 5215 | 5922 | 6837 | 7752 | 8698 | 9696 |
| 0155 | 0896 | 1941 | 3069 | 3897 | 5251 | 6026 | 6866 | 7787 | 8820 | 9741 |
| 0167 | 1016 | 2029 | 3152 | 3935 | 5287 | 6045 | 6928 | 7836 | 8823 | 9793 |
| 0205 | 1051 | 2063 | 3189 | 3969 | 5310 | 6046 | 6968 | 7840 | 8830 | 9844 |
| 0238 | 1052 | 2127 | 3208 | 3995 | 5371 | 6069 | 7027 | 7887 | 8832 | 9926 |
| 0246 | 1141 | 2200 | 3230 | 4046 | 5387 | 6108 | 7037 | 7936 | 8834 | 9978 |
| 0340 | 1142 | 2203 | 3303 | 4066 | 5389 | 6176 | 7042 | 7946 | 8858 | 9979 |
| 0367 | 1201 | 2225 | 3339 | 4076 | 5428 | 6181 | 7146 | 8029 | 8862 | 9980 |
| 0378 | 1228 | 2257 | 3364 | 4135 | 5453 | 6311 | 7309 | 8069 | 9023 | 9981 |
| 0450 | 1314 | 2375 | 3387 | 4141 | 5458 | 6425 | 7324 | 8081 | 9026 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 19 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 13/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/-: **GL-03 : 3765** — हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0045 | 0926 | 1012 | 2608 | 4537 (महाराजा लॉटरी सेंटर, इचलकरंजी) | 6049 | 6696 | 8408 | 9141 | 9492 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0547 | 1473 | 1685 | 1965 | 2529 | 5893 | 6020 | 7600 | 7788 | 8118 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0601 | 2393 | 2695 | 3267 | 4167 | 4968 | 4973 | 6687 | 7854 | 9088 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0137 | 0496 | 1128 | 2648 | 3867 | 4450 | 6576 | 6648 | 7869 | 9646 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1186 | 2003 | 2625 | 3719 | 4467 | 5305 | 6221 | 6936 | 8148 | 9218 |
| | | 1312 | 2027 | 2733 | 3735 | 4475 | 5331 | 6266 | 7060 | 8188 | 9259 |
| 0024 | 0643 | 1412 | 2061 | 2795 | 3738 | 4476 | 5380 | 6288 | 7062 | 8198 | 9291 |
| 0092 | 0696 | 1461 | 2135 | 2825 | 3802 | 4502 | 5421 | 6297 | 7127 | 8222 | 9311 |
| 0098 | 0702 | 1471 | 2172 | 2912 | 3830 | 4515 | 5445 | 6410 | 7168 | 8268 | 9446 |
| 0101 | 0711 | 1516 | 2221 | 2947 | 3831 | 4517 | 5462 | 6456 | 7254 | 8293 | 9452 |
| 0102 | 0731 | 1519 | 2229 | 2962 | 3847 | 4541 | 5542 | 6468 | 7281 | 8412 | 9481 |
| 0130 | 0770 | 1522 | 2233 | 3018 | 3853 | 4584 | 5553 | 6478 | 7349 | 8496 | 9501 |
| 0163 | 0773 | 1531 | 2234 | 3070 | 3953 | 4587 | 5567 | 6490 | 7474 | 8549 | 9528 |
| 0185 | 0830 | 1537 | 2269 | 3173 | 4064 | 4616 | 5579 | 6542 | 7487 | 8583 | 9550 |
| 0258 | 0836 | 1576 | 2286 | 3228 | 4097 | 4672 | 5645 | 6546 | 7609 | 8701 | 9609 |
| 0291 | 0844 | 1593 | 2321 | 3291 | 4113 | 4679 | 5681 | 6583 | 7675 | 8802 | 9696 |
| 0299 | 0868 | 1654 | 2322 | 3310 | 4225 | 4680 | 5763 | 6620 | 7723 | 8824 | 9802 |
| 0320 | 0901 | 1690 | 2402 | 3333 | 4244 | 4744 | 5777 | 6634 | 7736 | 8833 | 9803 |
| 0396 | 0995 | 1695 | 2421 | 3381 | 4341 | 4773 | 5885 | 6642 | 7778 | 8840 | 9855 |
| 0476 | 1083 | 1729 | 2427 | 3382 | 4409 | 4820 | 5915 | 6670 | 7797 | 8871 | 9895 |
| 0497 | 1116 | 1732 | 2429 | 3404 | 4419 | 4883 | 5925 | 6672 | 7890 | 8880 | 9904 |
| 0506 | 1125 | 1871 | 2459 | 3482 | 4437 | 5045 | 6008 | 6685 | 8028 | 8889 | 9918 |
| 0509 | 1154 | 1910 | 2522 | 3503 | 4442 | 5167 | 6031 | 6688 | 8104 | 8907 | 9935 |
| 0538 | 1169 | 1963 | 2529 | 3558 | 4448 | 5225 | 6065 | 6765 | 8127 | 8928 | 9936 |
| 0543 | 1171 | 1983 | 2569 | 3576 | 4449 | 5250 | 6166 | 6769 | 8132 | 9034 | 9964 |
| 0605 | 1181 | 1993 | 2572 | 3644 | 4461 | 5275 | 6172 | 6862 | 8135 | 9120 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# अविवाहित मुलं आणि त्यांची अस्वस्थता !

**साधारणपणे आठ दिवसांपूर्वी मी एक केस संपवून कोर्टरूमच्या बाहेर आलो. समोर पंचविशीतील एक मुलगा उभा होता. तो माझ्या जवळ आला आणि म्हणाला, सर, मला काही कायदेशीर मदत हवी आहे. तुम्ही ती कराल का? माझी लगेच दुसऱ्या कोर्टासमोर केस होती. मी त्याला सोबत घेत दुसऱ्या कोर्टात जाईपर्यंत त्याचे म्हणणे ऐकत होतो. तो म्हणाला, मला लग्न करायचे आहे आणि त्यासंदर्भात माहिती विचारायची होती. मी त्याला विचारले, काय माहिती हवी आहे? तर तो म्हणाला, मुलीचे वय १४ वर्षे आहे, त्यामुळे काही अडचण येईल का? मी त्याला विचारले, १४ वर्षांची मुलगी लग्नाला तयार झाली कशी? तर तो म्हणाला की, मी तिला विकत घेतले आहे.**

हे माझ्यासाठी खूपच धक्कादायक होते. मुलगी कुठे आहे हे विचारल्यावर तो फक्त एका जागी आहे असे म्हणाला. आता माझ्यासमोर त्या मुलीचा शोध घेण्याचे मोठे आव्हान होते. पण तो तिच्याबद्दल सहज सांगणार नाही, हेही स्पष्ट होते.

मग त्याला अधिक विश्वासात घेऊन बोलते करावे म्हणून मी इतर काही गोष्टी विचारायला सुरुवात केली. त्यातून समजले की, तो शहरातीलच एका प्रचलित शिक्षण संस्थेत समाजसेवा विषयाचे शिक्षण घेत आहे. त्या संस्थेच्या प्रमुखांना आणि तिथे काम करणाऱ्या एका मित्राला (मी इथे त्यांची नावे मुद्दाम लिहीत नाही. कारण या पूर्ण प्रकरणात संस्थेचे नाव यावे अशी माझी इच्छा नाही) फोन केला आणि त्या मुलाचे नाव सांगून तो तिथे शिक्षण घेतो का, तसेच त्याने स्वतःबद्दल दिलेली माहिती खरी आहे का, याची पडताळणी केली. पुढील चौकशीत त्याची गरज पडू शकत होती.

चौकशीत एवढेच समजले की, मुलीचा सौदा साठ हजार रुपयांत झाला असून, तिला आई-वडील नाहीत आणि तिचे चुलतेच तिची विक्री करत आहेत.

माझी केस निघत आहे असे सांगून त्या मुलाला मी थोडा वेळ बाहेर थांबायला सांगितले. माझ्या ज्युनियर/कलीगला त्याच्यावर संशय येणार नाही अशा अंतरावरून लक्ष ठेवायला सांगितले.

मुलीच्या संरक्षणाच्या दृष्टीने मला पुढचे पाऊल उचलणे गरजेचे होते. त्यामुळे मी औरंगाबाद खंडपीठाचे मुख्य सरकारी वकील अमरजीत गिरासे यांच्याशी संपर्क केला. ज्युनियरला त्याच्या मागावर ठेवून आम्ही त्यांच्या चेंबरमध्ये जाऊन पुढील योजना आखली. त्यांनी तत्काळ पोलीस आयुक्तांना फोन केला आणि पोलीस आयुक्तांनीही प्रकरणातील गांभीर्य ओळखून आमच्याकडे क्राईम ब्रांचचे गजानन कल्याणकर यांना पाठवले. तोपर्यंत मी त्या मुलाला विश्वासात घेऊन मुलीला समोर आणणे गरजेचे होते. म्हणून मी त्याला एक सल्ला दिला. मी त्याला सांगितले, त्या मुलीला इथे घेऊन ये. आपण तिचे एक शपथपत्र तयार करू की, सदरील विवाह ती तिच्या मर्जीने करत आहे.

ही गोष्ट त्याला पटली आणि त्याचा माझ्यावर विश्वास बसला होता. तोपर्यंत संस्थेने त्याची संपूर्ण माहिती मला पाठवली होती. त्यात त्याच्या घराचा पत्ता, आई-वडिलांची नावे आणि मोबाईल नंबर असे सर्व तपशील होते. तेवढे सांगून मी त्याला मुलीला घेऊन यायला सांगितले.

तोपर्यंत गिरासे सरांच्या केबिनमध्ये क्राईम ब्रांचचे कल्याणकरही आले होते. मला संस्थेकडून मिळालेली माहिती मी त्यांना दिली. त्यांनी तत्काळ त्यांच्या कार्यालयातून मोबाईल लोकेशन तपासून खात्री केली की, मोबाईल संस्थेने दिलेल्या पत्त्यावर सक्रिय आहे. त्यानंतर त्यांनी टीम तयार करून घराची पाहणी केली.

**- ॲड. महेश भोसले**

आमचा प्लॅन असा होता की, मुलाला मुलीसह माझ्या ऑफिसमध्ये बोलवायचे आणि ट्रॅप करून आधी मुलीची सुटका करायची व तिची सुरक्षा निश्चित करायची.

मी त्या मुलाला फोन केला, पण कुठलाही प्रतिसाद नव्हता. काही वेळाने पुन्हा फोन केला असता तो त्याच्या वडिलांनी उचलला. मी मुलाचे नाव घेऊन तो कुठे आहे विचारल्यावर त्यांनी शंका येऊन विचारले, का हो सर, काय केले त्याने? काही झाले का?

मी त्यांना सांगितले, काहीही झालेले नाही. तो मला भेटायला येणार होता म्हणून आला का, नाही हे विचारण्यासाठी फोन केला. मला गावी जायचे आहे आणि मी त्याची वाट पाहत आहे.


तो घरी आला की, फोन करायला सांगतो, असे म्हणून त्यांनी फोन ठेवला.

हा संवाद गिरासे सर आणि कल्याणकर यांच्या समोरच झाला होता. त्यामुळे त्यांनी तत्काळ क्राईम ब्रांचची टीम मुलाच्या घरी पाठवली आणि लोकेशन निश्चित केले.

त्यानंतर कल्याणकर यांनी स्वतः लक्ष घालून मुलाच्या घरी भेट दिली आणि मुलाचा फोटो मला पाठवून तोच असल्याची खात्री केली. त्यानंतर त्यांनी मुलाची आणि घरातील इतर मंडळींची चौकशी केली. त्यातून जे सत्य बाहेर आले ते अत्यंत विचित्र होते.

तो मुलगा २५ वर्षांचा होता आणि त्याचे लग्न होत नव्हते. त्यामुळे तो नैराश्यात गेला होता. अशात त्याला कुणीतरी भेटले आणि मुलगी विक्रीला असल्याचे सांगितले. तो मुलगी विकत घ्यायला तयार झाला. मात्र आधी काही कायदेशीर अडचण येणार नाही ना, याची खात्री करून घेण्यासाठी तो कोर्टात एखाद्या वकिलाचा सल्ला घ्यायला आला होता आणि योगायोगाने त्याला मी भेटलो.





तो मानसिक तणावाखाली होता आणि कुठेही लग्नासाठी मुलगी शोधत फिरत होता. माझा फोन गेल्यावर आता काय झाले? या काळजीतून त्याच्या वडिलांनी विचारणा केल्याचे त्यांनी सांगितले. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे. वडील हॉटेलमध्ये वेटर आहेत आणि आई घरकाम करते.

मी त्या मुलाला बोलताना विचारले होते, अरे, पण ती मुलगी तुझ्यासोबत कशी राहील? ती नंतर म्हणाली की, मला राहायचे नाही, तर काय करशील?

यावर तो म्हणाला, एकदा लग्न होऊन लेकरू झाले की मग ती कुठे जाणार? आणि ते लोक पैशाची जबाबदारीही घेत आहेत. त्याच्या या बोलण्याने मी हादरलो होतो.

गिरासे साहेबांनी दाखवलेली तत्परता आणि काळजी अत्यंत महत्त्वाची होती. त्यांनी काय काय केले हे काही बंधनांमुळे मी इथे पूर्ण लिहू शकत नाही. तसेच क्राईम ब्रांचचे कल्याणकर यांनी स्वतः लक्ष घालून मला सतत अपडेट देत अवघ्या सहा तासांत हे प्रकरण संपवले. सर्व चौकशी झाल्यावर कल्याणकर यांनी मला सांगितले की तो लग्नानंतर चॅट जीपीटीवर चर्चा करायचा. माझे लग्न होईल का? कधी होईल? असे प्रश्न त्याने त्यावर विचारलेले आहेत. आपण समजू शकतो तो कुठल्या मानसिकतेतून जात आहे.

आता यात काही प्रश्न अनुत्तरीत आहेत. एक म्हणजे अशा मुली विकणाऱ्या लोकांच्या चौकशीचे काय? तो मुलगा मानसिक तणावात असल्याने आज त्यावर काही मर्यादा आहेत. पण महाराष्ट्रभर अशा टोळ्या कार्यरत आहेत. गेल्या दोन वर्षांत केवळ औरंगाबाद शहरातून काही मुली बेपत्ता झाल्या आहेत.

बीडमध्ये एका मुलीने आठ मुलांशी लग्न करून त्यांना फसवले आहे. अशा प्रकारे लग्न करून पैसे आणि सोने घेऊन पळून जाण्याच्या घटना रोज घडत आहेत.

हेरंब कुलकर्णी यांनी एक सर्वेक्षण केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रत्येक खेड्यात तीस वर्षांपेक्षा जास्त वयाची काही मुलं अविवाहित आहेत.

वंशाला दिवा हवा या मानसिकतेतून आपल्या समाजात मुलींचे गर्भपात झाले आणि त्यामुळे विवाहासाठी मुलगी मिळणे कठीण झाले आहे. आमच्या बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात १००० मुलांमागे केवळ ६२८ मुली आहेत. इतर राज्यांत तो आकडा साधारण ८०० च्या आसपास असेल. म्हणजेच जवळपास २०० मुलं अविवाहित राहतात.

ज्या मुली विवाहयोग्य वयात आहेत त्यांच्याकडे निवडीचा पर्याय आहे. त्यामुळे त्यांना लग्न करायचे असेल तर त्या योग्य मुलाची निवड करतात.

गावागावांतील अनेक मुलांना शिक्षण नाही. ज्यांच्याकडे शिक्षण आहे त्यांच्याकडे नोकरी नाही. आर्थिक स्त्रोत नाहीत. हातात मोबाईल आणि डेटा आहे, त्यामुळे दिवसभर आपल्याकडे काम नाही, याची जाणीवही त्यांना होत नाही.

कुठल्याही पक्षाशी किंवा नेत्याशी हे लोक बांधिल झालेले आहेत. निवडणुकीच्या काळात फुकट दारू आणि मटणावर दिवस काढणे सुरू आहे. बांधावर मेलेल्या बापापेक्षा या मुलांना आपल्या नेत्याची इज्जत मोठी वाटते. आई-वडील रानात काम करत असताना हे कुणाच्या तरी नेत्याचे कार्यकर्ते म्हणून मिरवत राहतात. स्वतःची कोणतीही जबाबदारी घेत नाहीत.

आता तर शाळादेखील बंद होऊ लागल्या आहेत. गरिबांची मुलं महागड्या शाळांत जाऊ शकत नाहीत. त्यामुळे शिक्षणही मिळणार नाही. अशा परिस्थितीत वेगवेगळ्या धर्मांची आणि पक्षांची नशा डोक्यात घालून कुठलीही गोष्ट अस्मितेची बनवली की फुकट राबणारे कार्यकर्ते तयार होतात, हे सर्व पक्षीय नेत्यांनी दाखवून दिले आहे. आज लग्न होत नाही हा एक मुद्दा आहेच, पण उद्या आपले आता लग्न होणारच नाही या विचाराने ही मुलं मनोरुग्ण होतील. आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, त्यांच्या नैसर्गिक, शारीरिक गरजा पूर्ण करण्यासाठी ते जो मार्ग निवडतील, तो समाजासाठी अत्यंत घातक ठरू शकतो.

यावर वेळीच उपाय केला पाहिजे, असे मला वाटते. म्हणूनच हा प्रसंग इथे लिहिला आहे.

## भाडेकरूने घरमालकाची शांतता भंग करणे हा 'उपद्रव'

### पुण्यातील 'श्रीराज लॉज' रिकामे करण्याचे आदेश

■ मुंबई

**पुण्यातील** 'बुधवार पेठ' भागातील 'श्रीराज लॉज' चालवणाऱ्या भाडेकरूला उच्च न्यायालयाने मोठा दणका दिला. लॉजमधील ग्राहकांमुळे होणाऱ्या उपद्रवाचा आणि त्रासाचा विचार करून न्यायालयाने संबंधित लॉज तीन महिन्यांत रिकामे करून त्याचा ताबा मालकाकडे देण्याचे आदेश दिले.

एखादा भाडेकरू शेजारी राहणाऱ्या मालकाच्या खासगी जीवनात व मानसिक शांततेत बाधा आणणारा व्यवसाय करीत असेल, तर तो 'उपद्रव' मानला जाईल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

प्रसिद्ध बुधवार पेठ येथील घर क्रमांक १९२२ मधील जागा शब्बीर फिदाहुसेन काचवाला यांच्या मालकीची आहे. या इमारतीत ५० वर्षांहून अधिक काळ 'श्रीराज लॉज' भाड्याने चालवले जात आहे. घरमालक हे त्याच इमारतीच्या चौथ्या मजल्यावर राहतात. लॉजमध्ये येणाऱ्या ग्राहकांमुळे होणारी गर्दी, जिन्यांमध्ये लोकांचे झोपणे, कचरा, दारू पिऊन होणारी भांडणे आणि अनैतिक कृत्ये यामुळे आपल्या कुटुंबाला, विशेषतः महिलांना मानसिक त्रास होत असल्याचा दावा घरमालकाने केला होता. या प्रकरणात यापूर्वी पुणे येथील लघुवाद आणि जिल्हा न्यायालयाने घरमालकाची मागणी फेटाळून लावली होती. त्या निर्णयाला घरमालकाने उच्च न्यायालयात आव्हान दिले. घरमालकाच्या याचिकेवर न्यायमूर्ती संदीप व्ही. मारणे यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला आणि कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवला.

## मुंब्र्यात इमारतीवरून उडी घेऊन महिला डॉक्टरची आत्महत्या

■ ठाणे

**ठाण्यातील** मुंब्रा परिसरात पालिकेच्या सेवेत कार्यरत असलेल्या महिला डॉक्टर डॉ. शारमिंग डिंगा यांनी इमारतीवरून उडी मारून आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. डॉ. शारमिंग डिंगा या हकीम अजमल खान रुग्णालयात डॉक्टर म्हणून कार्यरत होत्या. त्या मुंब्रा येथील ग्रेस स्कोअर इमारतीत वास्तव्यास होत्या. त्यांनी याच इमारतीवरून उडी मारून आपले जीवन संपवले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

## १५ जूनपासून शाळा सुरू करण्याच्या आदेशाला नागपूर खंडपीठात आव्हान

■ नागपूर

**राज्यातील** सर्व प्राथमिक शाळा १५ जूनपासून सुरू करण्याच्या शासनाच्या आदेशाला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण समितीने मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे आव्हान दिले आहे. विदर्भातील उष्ण व दमट हवामानाचा विचार करता या भागातील शाळा २६ जूननंतरच सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी समितीने न्यायालयात केली आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे नागपूर जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे यांनी दाखल केलेल्या याचिकेत, विदर्भातील उष्णतेचा विचार करता शाळा उशिरा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने राज्य सरकारला नोटीस बजावून याचिकेतील मुद्यांवर येत्या ९ जूनपर्यंत स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिले.

## मोदींच्या आवाहनाला भाजपाचाच हरताळ? साताऱ्यामध्ये कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी

■ सातारा



**जागतिक** स्तरावर सुरू असलेले तणाव, डळमळीत अर्थव्यवस्था आणि परकीय चलन बचतीची गरज लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काटकसरीचे आवाहन केले आहे. साताऱ्यात होणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेतील ५ लाख घरांच्या लोकार्पण सोहळ्यावर होणाऱ्या कथित कोट्यवधींच्या खर्चामुळे भाजपाच आपल्या नेत्याच्या आवाहनाला हरताळ फासत असल्याची चर्चा रंगली आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, महायुतीतील मंत्री, खासदार, आमदार आणि हजारो कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.कार्यक्रमासाठी २ ते ४ हेलिपॅड, मंत्र्यांसाठी शेकडो वाहनांचा ताफा, पोलीस बंदोबस्त, लाभार्थ्यांसाठी सुमारे ४०० एसटी बसेस, खासगी वाहने, हजारो फूड पॅकेट्स, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या तसेच पंखे आणि कुलर यासाठी सरकारी तिजोरीतून कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी होत असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी थेट सवाल उपस्थित केला आहे. ते म्हणाले की, सामान्य जनतेने काटकसर करावी, असे सांगणारे सरकार स्वतः मात्र त्या आवाहनाचे पालन का करत नाही?

## निवडणुकीसाठी तिसरे मूल लपवले एमआयएमच्या नगरसेवकाला अटक

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर महापालिका निवडणूक लढवण्यासाठी एमआयएमच्या नगरसेवकाने स्वतःच्या तिसऱ्या मुलाला सख्ख्या भावाचा मुलगा असल्याचे दाखवत बनावट कागदपत्रे तयार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एमआयएमचे नगरसेवक मेहराज खान आणि शाळेचे मुख्याध्यापक इलियास कदीर सिद्दिकी यांना पोलिसांनी अटक केली आहे. याशिवाय नगरसेवकाची पत्नी निलोफर मेहराज खान, मिनाज खान जलील खान, इकरा मिनाज खान आणि सज्जू उस्ताद यांच्याविरुद्धही सिटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मार्च २०२६ मध्ये सिल्लेखाना परिसरात माजी नगरसेवक रफतयार खान यांच्यावर लोखंडी रॉड आणि बेसबॉल बॅटने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या घटनेचा तपास करताना पोलिसांनी एका १४ वर्षीय मुलाला ताब्यात घेतले होते. चौकशीत या मुलाने आपले वडील मिनाज खान आणि आई इकरा मिनाज खान असल्याचे सांगितले होते. त्याच्या आधार कार्डवरही हीच नोंद होती. मात्र पुढील तपासात हा मुलगा प्रत्यक्षात मिनाज खान याचा नसून तो मेहराज खान आणि निलोफर खान यांचाच तिसरा मुलगा असल्याचे उघड झाले. या मुलासाठी बनावट जन्मदाखला तयार करण्यात आला होता. तसेच शाळेच्या बोनाफाईड प्रमाणपत्रातही खोटी माहिती देण्यात आली होती. पोलीस तपासात सज्जू उस्ताद याने बनावट जन्मदाखला तयार केल्याचे उघड झाले, तर मुख्याध्यापक इलियास सिद्दिकी यांनीही चुकीचे प्रमाणपत्र दिल्याचे उघड झाले. दरम्यान, महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरताना मेहराज खान यांनी शपथपत्रात आपल्याला केवळ दोनच अपत्ये असल्याचे नमूद केले होते.

## वसई-विरार मेट्रो मार्गाला गती प्रकल्प अहवाल शासनाकडे

■ वसई

**वसई-विरार** परिसरातील वाढती लोकसंख्या आणि प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता मेट्रो सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) चे आयुक्त संजय मुखर्जी यांनी मेट्रो मार्ग १३ (मीरा-भाईंदर ते वसई-विरार) चा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

या निर्णयामुळे येत्या काळात वसई ते मुंबई प्रवास अधिक वेगवान होण्याची शक्यता असून, वेळ आणि इंधनाची बचत होणार आहे. बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष तथा माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. सल्लागार संस्था दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (डीएमआरसी) यांनी या मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सादर केला आहे.

माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड
(राष्ट्रासाठी जहाजे व पाणबुड्यांचे निर्माते)
(भारत सरकारचे उपक्रम, संरक्षण मंत्रालय)
सीआयएन: L35100MH1934GOI002079
नोंदणीकृत व कॉर्पोरेट कार्यालय: डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१०. दूर.: ०२२-२३७६२०१५,
वेबसाईट: https://mazagondock.in





३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाकरिताचे लेखापरीक्षित एकमेव व एकत्रित वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५ (सेबी (एलओडीआर) विनियम, २०१५) मधील नियम ३३ च्या अनुषंगाने, माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (कंपनी) च्या संचालक मंडळाने गुरुवार, ३० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सभेत ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता कंपनीचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष (एकमेव व एकत्रित) मंजूर केले आहेत. (निष्कर्ष)

सदर निकालासह, कंपनीचे वैधानिक लेखापरीक्षक असलेल्या मे. सारडा अ‍ॅण्ड पारीख एलएलपी (सनदी लेखापाल) यांनी जारी केलेले स्वतंत्र लेखापरीक्षकांचे अहवाल हे कंपनीच्या https://mazagondock.in या वेबसाईटवर, तसेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड या स्टॉक एक्सचेंजच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

सेबी (एलओडीआर) विनियम, २०१५ च्या विनियम ४७ चे पालन करत, आम्ही याद्वारे सूचित करतो की, खालील **क्विक रिस्पॉन्स (क्यूआर) कोड** स्कॅन करून देखील सदर माहिती पाहता येईल.

संचालक मंडळाच्या वतीने व करिता
सही/-
रुचिर अग्रवाल
संचालक (वित्त) आणि सीएफओ
डीआयएन - १०१६६५३३

दिनांक: ३०.०४.२०२६
ठिकाण: मुंबई

cbc10206/11/0001/2627

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# लाखो विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षेची पुनर्शिक्षा

भारतीय शिक्षण व्यवस्थेला सुधारण्याचे प्रयत्न होत असताना अनेक महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होते. देशभर नवे शैक्षणिक धोरण लागू करत असताना या धोरणांप्रमाणे नव्या परीक्षा धोरणाची आवश्यकता आहे. पण त्याचा विचारच झालेला दिसत नाही. प्रामुख्याने देशपातळीवर संयुक्तपणे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची वेळ आलेली आहे. यावर्षीच्या नीट परीक्षांचा पेपर फुटण्याचा प्रकार परीक्षा पद्धतीतल्या गंभीर त्रुटींवर बोट ठेवणारा आहे. सलग तिसऱ्या वर्षी नीट परीक्षांचे पेपर फुटण्याचे प्रकार घडत आहेत. एकीकडे देशाच्या विकासाचे आणि प्रगतीचे गोडवे गायले जातात. देशात होत असलेली डिजिटल क्रांती किंवा ऑनलाईन व्यवहारांचे कौतुकही होत असते. मात्र जिथे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न असतो त्याबाबतीत दाखवली जाणारी उदासीनता अत्यंत गंभीर स्वरूपाची ठरते. यावेळच्या नीट परीक्षांना २२ लाख विद्यार्थी बसले होते. हा पेपर नाशिकला छपाईसाठी दिला जातो असे सांगितले गेले. आणि तिथूनच तो लीक झाला. तब्बल दहा लाख रुपयांना हा पेपर खरेदी केला गेला. आणि नंतर पंधरा लाखांना त्याची विक्रीही झाली. त्यासंदर्भात नाशिकमधून खैरनार नावाच्या युवकाला अटक झालेली आहे. सध्या नाशिकमध्ये अशा प्रकारच्या गैरकृत्यांचाही कुंभमेळा सुरू आहे की काय असे वाटू लागते. खरे तर देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली ही नीट परीक्षेबाबत इतका हलगर्जीपणा दाखवला जात असेल तर सरकारी यंत्रणा या विद्यार्थ्यांना किती सहजपणे दुर्लक्षित करू शकतात याचे हे उदाहरण ठरते. दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा अधिक काटेकोरपणे पार पाडाव्यात म्हणून प्रयत्न केला जातो. अशावेळी नीटसारख्या महत्त्वपूर्ण परीक्षेबाबत किती प्रचंड काळजी घेण्याची आवश्यकता आहे हे लक्षात घेतले पाहिजे. पेपर फुटल्यानंतर पुढच्या दोन दिवसांत संपूर्ण परीक्षा रद्द केली गेली. आणि आता जून महिन्यात या बावीस लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेला सामोरे जावे लागेल. म्हणजे ज्या नीट परीक्षेचा अभ्यास बारावीचे विद्यार्थी वर्षभर करीत होते. शिवाय बारावीच्या अभ्यासाची त्यांना तयारी करावी लागत होती. या दोन्ही परीक्षांच्या तणावातून मुक्त होत असतानाच त्यांच्यावर पुन्हा परीक्षेची टांगती तलवार ठेवली गेली आहे.

**शिफारशींकडे दुर्लक्ष**

एकीकडे भारतीय अभ्यास पद्धती जागतिक दर्जाची व्हावी म्हणून प्रयत्न केले जातात. परंतु परीक्षा पद्धती अशी सुमार दर्जाची ठेवून आपल्या शिक्षण व्यवस्थेचे आपणच धिंडवडे काढत राहतो. असे म्हणण्याचे कारण म्हणजे २०२४ मध्ये जेव्हा पहिल्यांदा नीट परीक्षेचा पेपर फुटला त्यावेळी 'इस्त्रो' या संस्थेचे माजी प्रमुख के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नेमली गेली त्या समितीने जवळपास १०१ सुधारणा सांगणारा अहवाल दिला होता. त्यापैकी केवळ पंधरा ते सोळा सुधारणांचा विचार झाला. ८४ शिफारशींमध्ये दुर्लक्ष केले गेले. जर या शिफारशींची अंमलबजावणी झाली असती तर कदाचित यावेळचा पेपर फोडणाऱ्यांना कोणतीच संधी मिळाली नसती. एवढेच नव्हे तर अशा प्रकारची पेपरफुटी करणाऱ्यांना कायद्याप्रमाणे दहा वर्षांच्या कारागृहांची आणि एक कोटी रुपये दंडाची शिक्षा करण्याची तरतूदही कायद्यात केली गेली आहे. परंतु या नियमाप्रमाणे कारवाईच केली गेलेली नाही. याचा अर्थ अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांना मोकळे रान मिळते. किंवा तशा प्रकारचे संरक्षण उपलब्ध करून दिले जाते. यावेळच्या पेपरफुटीतून केंद्रीय शिक्षण खात्याची पूर्ण बेइज्जती झालेली आहे. गेल्या वर्षभरापासून केंद्रीय मंत्री धर्मेंद्रप्रधान ज्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण विभागाने बराच धुमाकूळ पाहायला मिळतो आहे. मग अगदी शैक्षणिक अभ्यासक्रमात न्यायालयांच्या बदनामीकारक धड्यांपासून ते विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नव्या नियमावलींपर्यंत अनेक प्रकार पाहायला मिळाले आणि आता तर नीट परीक्षांबाबत सलग तिसऱ्या वर्षी होत असलेला गैरप्रकार केंद्रीय शिक्षण खात्याचे वाभाडे काढणारा ठरतो. आज पुनर्परीक्षा घेण्याचा जरी निर्णय घेतला असला तरी या पेपरफुटीला जबाबदार ठरणाऱ्या अधिकाऱ्यांवर, कर्मचाऱ्यांवर काय कारवाई होणार आहे हेच स्पष्ट झाले पाहिजे

**पाच पन्नास अधिकाऱ्यांना निलंबित करा**

सरकारी कारभारातल्या या धटिंगणपणाचे परिणाम लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर होतात. सतत वर्षभर परीक्षांच्या तणावाखाली विद्यार्थ्यांना राहावेना. पुन्हा परीक्षा द्यावी लागणार या कल्पनेने अनेक विद्यार्थी पुन्हा मानसिकदृष्ट्या निराश झाले. आता ही पुनर्परीक्षा म्हणजे त्यांच्यासाठी पुनर्शिक्षाच म्हणावी लागेल. कोणताही दोष नसताना विद्यार्थ्यांना ही शिक्षा भोगायला लागते आहे. वारंवार होत असलेल्या या प्रकाराची अतिशय गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. आणि पुन्हा असे प्रकार होणार नाही यासाठी उपाययोजना झाली पाहिजे. राधाकृष्णन समितीने या परीक्षांचे संगणकीकरण होण्यावर सर्वाधिक भर दिला होता. एवढेच नव्हे तर वेगवेगळ्या राज्यांच्या ठिकाणी वेगवेगळी प्रश्नपत्रिका काढून पेपरफुटीचा प्रकार टाळता येऊ शकतात. अशीदेखील सूचना केली होती. पंतप्रधान मोदींनी अलिकडेच ऑनलाईन व्यवहारांना प्राधान्य देण्याची सूचना केली आहे. अशावेळी 'नीट'सारख्या महत्त्वाच्या परीक्षा पद्धतीतही ऑनलाईन पद्धतीचा प्रभावीपणे उपयोग करता येऊ शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्यावेळी असे प्रकार वारंवार होतात त्यावेळी ही सगळी प्रक्रिया राबवणाऱ्या यंत्रणेमध्येच मोठा दोष असल्याचे स्पष्ट होते. आपल्यावर कोणतीही कारवाई होणार नाही याची काळजी घेऊन हे सराईत गुन्हेगार मात्र मोकाट राहतात जोपर्यंत पाच-पन्नास अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले जात नाही तोपर्यंत नीट परीक्षेला लागलेली पेपरफुटीची कीड समूळ नाहीशी होणार नाही. नव्या शैक्षणिक धोरणात कमीत कमी कालावधीत अधिकाधिक अभ्यासक्रम करता येतील अशा प्रकारची व्यवस्था केली जाते आहे. परंतु इथे तर एकाच अभ्यासक्रमासाठी अधिकाधिक परीक्षा देण्याची शिक्षा भोगावी लागते आहे.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

खोट्या आशा दाखवून एखाद्या व्यक्तीच्या भावनांशी खेळण्यापेक्षा, स्पष्ट शब्दांत नकार देणं कधीही चांगलं.

## पंचांग

**गुरुवार, १४ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



*** वैशाख कृष्ण द्वादशी**
*** नक्षत्र : रेवती**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २२-३३ मीन**
**२२-३४ ते २४-०० मेष**

**रवी उदय- ०६-०६**
**रवी अस्त- १९-०४**

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती, प्रदोष, जनार्दन स्वामी पुण्यतिथी-काटोल**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### बनाना केक



★ **साहित्य :** केळे - २, ऑलिव्ह ऑईल - १/४ कप, दही - १/२ कप, साखर - १/२ कप (१०० ग्रॅम), मैदा - १ कप + २ मोठे चमचे (१५० ग्रॅम), बेकिंग पावडर - १ छोटा चमचा, बेकिंग सोडा - १/४ छोटा चमचा, व्हॅनिला इसेन्स - १/२ छोटा चमचा, चोको चिप्स - १/४ कप, मीठ-२ कप.

★ **कृती:** २ पूर्ण पिकलेली केळी सोलून, त्यांचे तुकडे करून एका भांड्यात घ्या. आता त्यात ऑलिव्ह ऑईल, दही आणि साखर घालून पेस्ट तयार करा. एका भांड्यात मैदा, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा एकत्र करा. हे मिश्रण दुसऱ्या भांड्यात दोनदा चाळून घ्या. यामुळे मिश्रण पूर्णपणे एकजीव होईल आणि त्यातील गुठळ्या निघून जातील. केक बनवण्यासाठी एक भांडे घ्या आणि त्याला तेलाने चांगले ग्रीस करा. भांड्याच्या तळाशी बटर पेपरचा एक तुकडा ठेवा आणि त्याला पुन्हा ग्रीस करा. आता एक कुकर घ्या. त्यात २ कप मीठ घाला आणि त्यावर एक जाळी ठेवा. कुकरच्या झाकणातून शिट्टी आणि गॅस्केट काढून टाका, कुकर बंद करा आणि ७-८ मिनिटे मोठ्या आचेवर गरम करा. केळ्याची पेस्ट एका भांड्यात घ्या आणि थोडी थोडी करून मिसळा. आता, मिश्रणात व्हॅनिला इसेन्स आणि ३/४ चॉकलेट चिप्स घालून चांगले मिसळा. मिश्रण तेल लावलेल्या भांड्यात ओता, त्याला हलकेच थापून घ्या आणि उरलेल्या चॉकलेट चिप्सने सजवा. ८ मिनिटांनंतर, भांडे कुकरमध्ये ठेवा आणि त्याचे झाकण लावा. मध्यम-मंद आचेवर सुमारे ५० मिनिटे बेक करा. ५० मिनिटांनंतर, सुरी घालून केक तपासा. जर सुरी स्वच्छ बाहेर आली, तर केक तयार आहे. कुकरमधून केक बाहेर काढा आणि ३० मिनिटे थंड होऊ द्या. थंड झाल्यावर, चाकू आणि प्लेटच्या मदतीने केक भांड्यातून बाहेर काढा. केकवरून बटर पेपर काढून टाका. मऊ आणि स्पॉन्जी केळीचा केक तयार आहे.
तुम्ही ऑलिव्ह ऑईलऐवजी कोणतेही रिफाईंड तेल वापरू शकता.

## क्रीडा



# पंजाब पराभवाची मालिका खंडित करणार

## धर्मशालामध्ये आज मुंबई इंडियन्सशी लढत

**धर्मशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट स्टेडियमवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या ५८ व्या सामन्यांत पंजाब किंग्स आणि. मुंबई इंडियन्स संघात लढत होणार आहे. पंजाबचा संघ पराभवाची मालिका खंडित करण्यासाठी मैदानावर उतरणार आहे. त्यासोबत पंजाब हा सामना जिंकून आयपीएलच्या प्लेऑफमध्ये जागा मजबूत करण्याचा प्रयत्न करणार आहे, तर मुंबईचा संघ याआधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. त्यामुळे मुंबई हा सामना एक औपचारिकता म्हणून खेळणार आहे.**



■ धर्मशाला

**स्पर्धेच्या** सुरुवातीला टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंजाबने सलग ४ सामने गमावले आहेत. हा संघ प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित करण्यासाठी संघर्ष करत आहेत. पंजाबला आपल्या उर्वरित सामन्यांपैकी किमान दोन सामने जिंकणे आवश्यक आहे. आयपीएलच्या या हंगामात पंजाबने आतापर्यंत ११ सामने खेळले आहेत. त्यातील ६ सामन्यांत विजय मिळवला, तर ४ सामन्यांत पराभव झाला. एक सामना पावसामुळे रद्द झाल्यामुळे पंजाब गुणतालिकेत १३ गुणांसह चौथ्या स्थानावर विराजमान आहे. मुंबईने आतापर्यंत ११ सामन्यांत आपले नशीब आजमावले आहे. त्यातील ३ सामन्यांत विजय नोंदवला, तर ८ सामन्यांत पराभूत व्हावे लागल्यामुळे मुंबई ६ गुणांसह गुणतालिकेत ९ व्या स्थानावर आहे.

पंजाबचे सलामीवीर प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. त्यांना कर्णधार श्रेयस अय्यर आणि कूपर कॉनोली यांनी चांगली साथ दिली आहे. त्यामुळे पंजाबने अनेक सामन्यांत मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना विजय मिळवला आहे. युवा फलंदाज सूर्यांश शेडगे आक्रमक फलंदाजी केल्यामुळे पंजाबला चांगला फायदा झाला आहे. मात्र गेल्या चार ते पाच सामन्यांत पंजाबच्या गोलंदाजांनी खराब कामगिरी केली आहे.

आयपीएलच्या पूर्वार्धात झेवियर बार्टलेट आणि अर्शदीप यांनी नव्या चेंडूने चांगली गोलंदाजी केली होती, पण लॉकी फर्ग्युसनच्या पुनरागमनामुळे अस्थिरता निर्माण झाली आहे. पंजाबने मागच्या सामन्यात बेन ड्वार्शियससह तीन डावखुरे वेगवान गोलंदाज खेळवले होते, जे खूप महागडे ठरले. अर्शदीपने खेळलेल्या ११ सामन्यांपैकी बहुतांश सामन्यांमध्ये प्रति षटक १० पेक्षा जास्त धावा दिल्या आहेत. मुंबईला पंजाबने हलक्यात घेऊ नये. कारण त्यांच्यात पंजाबच्या विजयात सुरुंग लावण्याची क्षमता आहे. मुंबईचा कर्णधार हार्दिक पंड्या दुखापतीमुळे मागील दोन सामने खेळू शकला नाही आणि तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे की नाही हे पाहणे बाकी आहे.

## मोहन बागानचे माजी अध्यक्ष स्वपन साधन बोस यांचे निधन

■ कोलकाता

**कोलकाता** फुटबॉल वर्तुळात 'टुटू बाबू' या नावाने ओळखले जाणारे मोहन बागानचे माजी अध्यक्ष स्वपन साधन बोस यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. भारतीय फुटबॉल प्रशासनातील सर्वात प्रभावशाली व्यक्तींपैकी एक असलेले बोस विविध आरोग्य समस्यांवर कोलकाता येथील खासगी रुग्णालयात उपचार घेत होते. कुटुंबियांकडून मिळालेल्या माहितीनुसार मंगळवारी रात्री ११.४५ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बोस यांचे नातू अरिंजय बोस यांनी फेसबुकवर पोस्ट केले की, अत्यंत दुःखाने आम्ही टुटू बोस यांच्या निधनाची घोषणा करत आहोत. ते एक आदर्श वडील आणि आजोबा होते. ते एक उत्कृष्ट प्रशासक होते आणि त्यांच्या सभोवतालच्या प्रत्येकासाठी एक मोठा आधार होते. मोहन बागानला देशातील सर्वोत्कृष्ट क्लबपैकी एक बनवण्यात बोस यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## ऑस्ट्रेलियन महिला संघ जाहीर सोफी मोलिनक्सकडे कर्णधारपद

■ सिडनी

**इंग्लंड** आणि वेल्समध्ये १२ जूनपासून सुरू होणाऱ्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकासाठी गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने आपल्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व अष्टपैलू खेळाडू सोफी मोलिनक्सकडे सोपवण्यात आले आहे. अनुभवी गोलंदाज डार्सी ब्राउनला वगळण्यात आले. ब्राऊनने ४१ टी-२० सामन्यांत ३४ विकेट घेतल्या. तिच्या जागी २० वर्षीय लूसी हॅमिल्टनचा संघात समावेश करण्यात आला. हॅमिल्टनकडे जरी आंतरराष्ट्रीय टी-२० चा अनुभव कमी असला, तरी तिने १९ वर्षांखालील विश्वचषकात ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले. ऑस्ट्रेलियन संघात एलिस पेरी, बेथ मूनी, अॅश गार्डनर आणि मेगन शट यांसारख्या दिग्गज खेळाडूंचा समावेश आहे.

**ऑस्ट्रेलियन महिला संघ :** सोफी मोलिनक्स (कर्णधार), निकोला केरी, अॅश गार्डनर, किम गार्थ, लूसी हॅमिल्टन, ग्रेसी हॅरिस, अलाना किंग, फोबे लिचफील्ड, ताहलिया मॅकग्रा, बेथ मूनी, एलिस पेरी, मेगन शट, नाबेल सदरलँड, जॉर्जिया वोल आणि जॉर्जिया वारेहम.

## प्रोफेसर छगला क्रिकेट स्पर्धेत जीएस मेडिकल कॉलेज विजेता



■ मुंबई

**प्रोफेसर** ए. एस. छगला इंटर मेडिकल क्रिकेट स्पर्धेत जी. एस. मेडिकल कॉलेज-केईएम हॉस्पिटलने डी.वाय.पाटील डेंटल कॉलेजचा ५ विकेटने पराभव केला आणि विजेतेपदाला गवसणी घातली. सलामीवीर अभिजित राठोड (७० धावा) व दिपेश कुमार (४२ धावा) यांच्या दुसऱ्या विकेटसाठी १०३ धावांच्या भागीदारीमुळे जी. एस. मेडिकलचा विजय सुकर झाला. बॉम्बे जिमखाना येथे झालेल्या अंतिम सामन्यात जी. एस. मेडिकल कॉलेज-केईएम हॉस्पिटल विरुध्द डी.वाय. पाटील डेंटल कॉलेजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली. फिरकी गोलंदाज श्रीराम फुलझालके (६ धावांत ३ बळी), निखिल नावन्डकर (३१ धावांत ३ बळी) व आदित्य बभाले (३८ धावांत २ बळी) यांच्या अचूक गोलंदाजीमुळे डी.वाय. पाटील डेंटल कॉलेजचा डाव ३०.४ षटकात १६५ धावांत संपुष्टात आला. सलामीवीर आरव अडवाणी (३१ चेंडूंत ३७ धावा), अष्टपैलू गौरव शेंडे (२६ चेंडूंत २५ धावा) व प्रणव कुमार (३५ चेंडूंत २३ धावा) यांनी छान फलंदाजी केली. विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना सलामीवीर अभिजित राठोड (६९ चेंडूंत ७० धावा) व दिपेश कुमार ( ३९ चेंडूंत ४२ धावा) यांनी धडाकेबाज फलंदाजी करून दुसऱ्या विकेटसाठी १०३ धावांची विजयी भागीदारी केली.

## परळमध्ये व्यावसायिक खो-खो स्पर्धा

**मुंबई** - मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्पोर्ट्स क्लब आयोजित 'पहिली व्यावसायिक निमंत्रित खो-खो स्पर्धा २०२६' परळच्या ऐतिहासिक विद्यार्थी क्रीडा केंद्राच्या लाल मैदानावर रंगणार असून, मुंबईतील व्यावसायिक खो-खोच्या इतिहासात हा स्पर्धेचा सोहळा विशेष पर्व ठरणार आहे. १४ मे ते १७ मे २०२६ दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत राज्यातील दिग्गज संघ विजेतेपदासाठी जीवाची बाजी लावणार आहेत. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत तब्बल १२ व्यावसायिक संघ सहभागी होत असून प्रत्येक संघ विजेतेपदावर नाव कोरण्यासाठी मैदानात उतरलेला आहे. स्पर्धेची आखणी बाद पद्धतीने करण्यात आली असून मैदानावर प्रत्येक सामन्यात चुरस, वेग आणि रणनीतीचा अद्भुत संगम पाहायला मिळणार आहे.

## मुंबई महापौर चषक कॅरम स्पर्धेत सिद्धांत-मितालीला प्रथम मानांकन

■ मुंबई

२३ वी मुंबई महापौर चषक जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा १६ आणि १७ मे २०२६ रोजी माटुंगा पश्चिम येथील जे. के. सावंत मार्ग, मामला मंदिरासमोर लोकमान्य नगर वातानुकूलित सभागृहात संपन्न होणार आहे. पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन गटांत ही स्पर्धा रंगणार असून, पुरुष एकेरी गटात १२० व महिला एकेरी गटात २४ खेळाडूंनी भाग घेतला. पुरुष एकेरी गटात डीकेसीसीच्या सिद्धांत वाडवलकरला आणि महिला एकेरी गटात जैन इरिगेशनच्या मिताली पाठकला प्रथम मानांकन देण्यात आले आहे. शनिवारी १६ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

**PUBLIC NOTICE**

My clients are in talks with Capt. Gagan Datta for the purchase of Flat No. 511, 5th Floor, "E" Wing, Mittal Park Co-operative Housing Society Limited, 44, Janardhan Mhatre Marg, Juhu, Mumbai-400049, bearing Share Certificate No. 99 and comprising 5 (five) shares numbered 516 to 520.
Any person or persons having any right title or interest by way of inheritance of claim against the said flat and shares should send their claims in writing to the undersigned along with the documentary evidence in support of the said claim thereof within 15 days of publication of the said Notice, failing which claims if any shall be deemed to have been waived.
Dated: 14.05.2026
Place: Mumbai

Sangram Chinnappa
Advocate
Address : 511, Prospect Chambers, D. N. Road, Fort, Mumbai - 400001.
Contact No. 9028566747

**जैमिनी इंजि-फॅब प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | जेमिनी इंजि-फॅब प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | दि. १२.०१.१९९८ |
| ३. | प्राधिकरण, ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणी झाली आहे | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U28920MH1998PTC112909 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ५०१, पाम स्प्रिंग, डी मार्ट शेजारी, लिंक रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ महाराष्ट्र. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | दि. २४ मार्च, २०२५<br>दि. ११ मे, २०२६ (राष्ट्रीय कंपनी कायदा अपिलीय न्यायाधिकरणाच्या दिनांक ११.०५.२०२६ च्या आदेशानुसार पुन्हा सुरु करण्यात आले.) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | दि. ०७ नोव्हेंबर, २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | पंकज गोविंदलाल खाडलोया<br>आयबीबीआय नोंदणी क्र.:<br>IBBI/IPA-001/IP-P-02485/2021-2022/13810 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | २०२ए विष्णू सदाशिव अपार्टमेन्ट, १७५४ सदाशिव पेठ, उदयन मंगल कार्यालयाजवळ, स्काऊट ग्राऊंडसमोर, पुणे, महाराष्ट्र - ४११०३०<br>ईमेल आयडीः pkhadloya@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पुणे कार्यालयः** २०२ए विष्णू सदाशिव अपार्ट., स्काऊट ग्राऊंडसमोर, १७५४ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.<br>**मुंबई कार्यालयः** २१/१६८, आनंद नगर, ओम को-ऑप. हौ. सोसायटी, आनंद नगर गल्ली, ऑफ नेहरू रोड, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०५५.<br>**प्रक्रिया ईमेल आयडीः** cirp.geminiengifab@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. २५ मे, २०२६ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि<br>(ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेलः | https://ibbi.gov.in/en/home/downloads |

**जेमिनी इंजि-फॅब प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि. २४ मार्च, २०२५ रोजी **जेमिनी इंजि-फॅब प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. या संदर्भातील जाहीर उद्घोषणा दि. २७ मार्च, २०२५ रोजी करण्यात आली होती. पुढे असे सूचित करण्यात येते की, सीआयआरपी प्रक्रिया त्यानंतर राष्ट्रीय कंपनी कायदा अपिलीय न्यायाधिकरणाच्या दिनांक २८ मार्च, २०२५ च्या आदेशानुसार स्थगित करण्यात आली होती.
तथापि, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा अपिलीय न्यायाधिकरणाने दिनांक ११ मे, २०२६ च्या आदेशाद्वारे उपरोल्लेखित अपील फेटाळले आणि कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया तात्काळ सुरु करण्याचे निर्देश दिले. वरील घडामोडींच्या अनुषंगाने, जेमिनी इंजि-फॅब प्रायव्हेट लिमिटेडच्या सर्व धनकोंच्या निदर्शनास आणून देण्याच्या उद्देशाने ही सूचना जारी करण्यात येत आहे की, माननीय अपिलीय प्राधिकरणाच्या निर्देशानुसार, कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रिया तात्काळ प्रभावाने पुन्हा सुरु करण्यात आली आहे.
जेमिनी इंजि-फॅब प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. २५ मे, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (प्रक्रिया ई-मेल नोंद क्र. १० मध्ये नमूद करण्यात आला आहे) सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

**पंकज गोविंदलाल खाडलोया**
**मे. जेमिनी इंजि-फॅब प्रायव्हेट लिमिटेड**चे अंतरिम ठराव व्यावसायिक
**आयबीबीआय नोंद. क्र.**- IBBI/IPA-001/IP-P-02485/2021-2022/13810
**आयबीबीआय नोंद. पत्ता** - २०२ए विष्णू सदाशिव अपार्टमेन्ट, १७५४ सदाशिव पेठ, उदयन मंगल कार्यालयाजवळ, स्काऊट ग्राऊंडसमोर, पुणे, महाराष्ट्र - ४११०३०
**आयबीबीआय नोंद. ईमेल आयडीः** pkhadloya@gmail.com
**एएफए वैधता** - ३०.०६.२०२७ पर्यंत
**प्रक्रिया ईमेल आयडीः** cirp.geminiengifab@gmail.com
**संपर्क क्र.** - ९४२३५८०८३६
दिनांकः १३.०५.२०२६
ठिकाणः पुणे

# धर्मस्थळ उत्खनन वादात मजूर यंत्रमालकांचे मानधन अद्याप रखडले

■ बंगळुरू

**धर्मस्थळ** येथील कथित दफन प्रकरणाशी संबंधित गाजलेल्या उत्खनन मोहिमेला जवळपास दहा महिने उलटल्यानंतरही त्या कामात सहभागी झालेल्या मजूर आणि यंत्रमालकांना अद्याप पैसे मिळाले नसल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

विशेष तपास पथकाने २९ जुलै ते १३ ऑगस्ट २०२५ दरम्यान धर्मस्थळ आणि परिसरातील १७ ठिकाणी उत्खनन केले होते. चिन्नय्या नावाच्या व्यक्तीने परिसरात शेकडो मृतदेह पुरल्याचा दावा केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. त्यावेळी या तपासाने देशभरात मोठे लक्ष वेधले होते. मात्र प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांचे आणि यंत्रमालकांचे म्हणणे आहे की, वारंवार पाठपुरावा करूनही त्यांची दोन लाख रुपयांहून अधिक थकबाकी अद्याप मिळालेली नाही. या थकबाकीत जेसीबी भाड्याचे ७१ हजार ५०० रुपये आणि मजुरीचे सुमारे ८० हजार रुपये समाविष्ट आहेत. याशिवाय शामियाना, साधनसामग्री, वाहनभाडे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि इतर लॉजिस्टिक सेवांचे पैसेही अद्याप अदा करण्यात आलेले नाहीत. उत्खननात सहभागी मजुरांनी सांगितले की, मुसळधार पाऊस आणि कडक उन्हातही त्यांनी सातत्याने काम केले. मात्र उत्खनन पूर्ण होऊन अनेक महिने उलटूनही देयकांबाबत कोणतीही स्पष्टता मिळालेली नाही. थकबाकी



देण्याची जबाबदारी नेमकी कोणाची यावर धर्मस्थळ ग्रामपंचायत आणि एसआयटी यांच्यात संभ्रम आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून जबाबदारी एसआयटीकडे ढकलली जात असून, तपास अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, देयक प्रक्रिया गेल्या नोव्हेंबरमध्येच पूर्ण करण्यात आली होती. एका ठेकेदाराने आरोप केला की, त्यांची मशीन सुमारे दहा दिवस वापरण्यात आली होती. प्रत्यक्ष वापरलेल्या दिवसांचेच बिल सादर करूनही अद्याप पैसे मिळाले नसल्याचा आरोप त्यांनी केला.

**देश विदेश**

# पाकिस्तानात वृक्षतोडीवरून २ गटांत वाद! ७ जण ठार

■ लाहोर

**पाकिस्तानमधील** खैबर पख्तुनख्वा प्रांतात झाडे तोडण्याच्या वादातून हिंसाचार झाला. नौशेरा जिल्ह्यात २ गटांमध्ये झालेल्या गोळीबारात ७ जणांचा मृत्यू झाला असून ३ जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना राजधानी पेशावर पासून सुमारे ४० किलोमीटर अंतरावर असलेल्या नौशेरा जिल्ह्यात झाली. परिसरातील झाडे तोडण्याच्या मुद्यावरून दोन गटांमध्ये आधी वाद झाला. हा वाद काही वेळातच तीव्र झाला आणि दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. अचानक झालेल्या गोळीबारामुळे परिसरात गोंधळ उडाला. या संघर्षात ७ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ३ जण जखमी झाले. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# ब्रिटनच्या स्टारमर सरकारच्या आणखी एका मंत्र्याचा राजीनामा

■ लंडन

**ब्रिटनमध्ये** पंतप्रधान कीर स्टारमर यांच्या नेतृत्वातील लेबर सरकारसमोरील राजकीय संकट अधिक गडद होत आहे. गृह मंत्रालयाच्या मंत्री जेस फिलिप्स यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत राजीनामा दिल्यानंतर, पीडित आणि महिला-मुलींवरील हिंसाचार निवारण मंत्री लेक्स डेव्हिस-जोन्स यांनीही पद सोडले. त्यानंतर आता कनिष्ठ मंत्री मियाटा फाहानबुले यांनीही राजीनामा देत स्टारमर यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. स्थानिक निवडणुकांतील अपयशी कामगिरीनंतर लेबर पक्षात असंतोष वाढला आहे. पक्षातील अनेक वरिष्ठ नेते नेतृत्वबदलाची मागणी करत असल्याची चर्चा रंगली आहे.

मियाटा फाहानबुले या २०२४ मध्ये प्रथमच खासदार म्हणून निवडून आल्या होत्या. त्याच वर्षी त्यांना सरकारमध्ये स्थान दिले होते. इतक्या कमी कालावधीत त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देणे हे धक्कादायक आहे. राजीनामा पत्रात फाहानबुले यांनी सरकारच्या काही निर्णयांवर कठोर टीका केली. हिवाळी इंधन अनुदानातील कपात तसेच दिव्यांग सहाय्यात कपात केल्यामुळे सरकारवरील जनतेचा विश्वास कमी झाल्याचे त्यांनी म्हटले.

# साबरमती मध्यवर्ती कारागृहातून जन्मठेपेचा कैदी चालत फरार झाला

■ अहमदाबाद

**साबरमती** सेंट्रल जेलमधून जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला एक कैदी मुख्य प्रवेशद्वारातून चालत बाहेर पडून फरार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. गुजरातमधील सर्वाधिक सुरक्षित समजल्या जाणाऱ्या तुरुंगांपैकी एक असलेल्या या तुरुंगातील सुरक्षाव्यवस्थेवर त्यामुळे गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

फरार झालेला कैदी मालदे रामाभाई परमार हा खून आणि पॉस्को कायद्यातील गुन्ह्यांमध्ये दोषी ठरलेला आहे. या घटनेनंतर उच्चस्तरीय चौकशी सुरू करण्यात आली असून, तुरुंगातील सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींवर मोठी चर्चा सुरू झाली आहे. तपासाशी संबंधित एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, ही केवळ फरारीची घटना नाही, तर संपूर्ण यंत्रणेतील गंभीर त्रुटी उघड करणारी बाब आहे. जेल प्रशासनाच्या तक्रारीनुसार, परमार याला उच्च सुरक्षा असलेल्या 'बडा चक्कर यार्ड क्रमांक ४' मध्ये ठेवण्यात आले होते. येथे एकूण ३३ कैदी होते.

# पणजी जेट्टीजवळील इमारतीत कॅसिनो नाही

■ पणजी

**पणजी** येथील जेट्टीजवळील नव्याने उभारण्यात आलेल्या इमारतीत कॅसिनोचे कार्यालय येणार असल्याच्या चर्चांना पूर्णविराम देत, स्थानिक आमदार मायकल लोबो यांनी स्पष्ट स्पष्टीकरण दिले आहे. ही इमारत केवळ बंदर कप्तान खात्याच्या कार्यालयासाठी वापरण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार लोबो यांनी संबंधित इमारतीची पाहणी केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. लोबो म्हणाले की, या इमारतीत कोणत्याही प्रकारचे कॅसिनो कार्यालय सुरू होणार नाही. इमारतीचे उद्घाटन गोवा घटकराज्य दिनानिमित्त ३० मे रोजी करण्याचा सरकारचा मानस आहे.

# थायलंडमध्ये ४ भारतीय पर्यटक अचानक बेशुद्ध! एकाचा मृत्यू

■ फुकेत

**थायलंडमधील** फुकेत येथे भारतीय पर्यटकांबाबत धक्कादायक आणि रहस्यमय घटना झाली. एका कॅफेमध्ये जेवण करत असताना ५ भारतीयांपैकी ४ जण अचानक बेशुद्ध पडले. यामध्ये कुशाग्र अग्रवाल या २६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला तर उर्वरित तिघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे भारतीय पर्यटकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून, थाई पोलीस आणि भारतीय दूतावास या प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत.

फुकेतमधील कमला बीच परिसरातील प्रसिद्ध कॅफेमध्ये रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास पाच भारतीय तरुण आले होते. २ वाजताच्या सुमारास त्यांच्यापैकी ४ जण एकामागून एक अचानक बेशुद्ध पडले. कॅफे कर्मचाऱ्यांनी तातडीने आपत्कालीन सेवांना माहिती दिली आणि सर्वांना रुग्णालयात दाखल केले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

पर्यटकांमध्ये कुशाग्र अग्रवाल, राहुल अग्रवाल, आणखी एक राहुल अग्रवाल, अमन अग्रवाल आणि आर्यन वर्मा यांचा समावेश होता. यापैकी आर्यनमध्ये कोणतीही लक्षणे आढळली नाही, तर उर्वरित चौघांची प्रकृती बिघडली होती. रुग्णालयाने दिलेल्या माहितीनुसार, कुशाग्र अग्रवाल आणि राहुल अग्रवाल यांची प्रकृती गंभीर होती. उपचारादरम्यान कुशाग्रचा मृत्यू झाला. उर्वरित तिघांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

# नाशिक सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे अनावरण




■ मुंबई

**नाशिक**-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अधिकृत बोधचिन्हाचे आज सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

या बोधचिन्हामध्ये भारतीय अध्यात्म, श्रद्धा आणि सिंहस्थ परंपरेचे दर्शन घडते. भगवान शंकराचे त्रिशूळ, त्र्यंबकेश्वर मंदिर याची छटा आणि शिवलिंगाच्या स्वरूपात साकारलेली गोदावरी नदी यांचा कलात्मक वापर करण्यात आला आहे. हे बोधचिन्ह केवळ धार्मिक भावनांचे प्रतीक नसून, भारतीय सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेशही प्रभावीपणे देणारे आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्यतेला साजेसा असा हा प्रतीकचिन्हात्मक नमुना असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडलेल्या या सोहळ्याला विविध मान्यवर उपस्थित होते. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीच्या दृष्टीने हा टप्पा महत्त्वाचा मानला जात आहे.

# मुख्यमंत्री विजय यांच्याकडून ज्योतिषाची सरकारी नियुक्ती रद्द

**चेन्नई** - सहकारी पक्ष आणि विरोधकांच्या तीव्र विरोधानंतर मुख्यमंत्री विजय यांनी आपले ज्योतिषी राधन पंडित यांची विशेष सरकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती एका दिवसात रद्द केली. कालच त्यांची नियुक्ती केली होती.

टीव्हीके म्हणजे तमिळग वेत्री कळगमचे सहकारी पक्ष आणि विरोधकांकडून या नियुक्तीवर मोठ्या प्रमाणावर टीका झाल्यानंतर मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी आपला निर्णय मागे घेतला. पंडित यांना ओएसडी पदावर बढती मिळाल्यानंतर तामिळनाडूच्या राजकीय वर्तुळात मोठा वाद निर्माण झाला होता. विदुथलाई चिरुथैगल काची माकप आणि सीपीआय या पक्षांनी या निर्णयावर उघडपणे टीका केली.

महाराष्ट्र शासन

**उप संचालक (दक्षिण) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालय**

Tel. No.022 28860362 E-mail - ddssgnp@gmail.com

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वन विभागासाठी **वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालयातील विविध कामांकरीता कंत्राटी पद्धतीने तांत्रिक सल्लागार या पदाची निवड करणे** आवश्यक असुन त्याबाबतची जाहिरात या कार्यालयामार्फत तयार करण्यात आली आहे. सदर कामाबाबतची सविस्तर जाहिरात वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशिल पाहून अर्ज सादर करावे.

सही/-
(किरण पाटील)
उप संचालक (दक्षिण)
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

ठिकाण :- बोरीवली
दिनांक :- ११/०५/२०२६
क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी ७६४

**दि हिंदुस्थान को-ऑप.बँक लि, मुंबई - ४०० ०२२**

बँकेच्या **कांदिवली** शाखेतील इंटेरिअर फर्निचर, फिक्चर (इलेक्ट्रीक वर्क्ससह), सिव्हील आणि इतर कामकाज करण्याकरिता खालील अटींवर निविदा मागविण्यात येत आहेत.

1) निविदा सादर करणारी व्यक्ती अथवा संस्था रजिस्टर्ड असावी.
2) निविदा सादर करणारी व्यक्ति अथवा संस्था (GST व इनकम टॅक्स भरणारी स्वत:ची अथवा कमीत कमी पाच वर्षासाठी भाडे तत्वावर धंद्याची जागा असलेली असावी.
3) निविदा लेटर हेडवर अपेक्षित आहे.
4) इंटेरिअर फर्निचर व इतर कामकाजाच्या निविदेसाठी रु.1,000/- (विना परताव्याची) तसेच "अर्नेस्ट मनी डिपॉझिट" म्हणून रु.1,00,000/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) रक्कम भरावी लागेल.
5) अर्नेस्ट मनी डिपॉझिटची रक्कम निविदा फेटाळल्यास परत केली जाईल.
6) निविदा स्विकारल्यास निविदेची रक्कम अनामत रकमेचा भाग म्हणून सामावून घेतली जाईल.
7) अर्नेस्ट मनी डिपॉझिटच्या रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

छापील निविदा बँकेच्या खालील पत्त्यावर कामकाजाच्या दिवशी दिनांक 15.05.2026 ते 22.05.2026 पर्यंत सकाळी 11.00 ते 5.00 या वेळेत मिळतील. निविदा शुक्रवार दिनांक 29.05.2026 पर्यंत सादर करण्यात याव्यात. निविदा स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
दि हिंदुस्थान को-ऑप. बँक लि., मुंबई

मुख्य कार्यालय : होरायझन टॉवर, पहिला व दुसरा मजला, जय शशांक को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., एटीआय समोर, व्ही.एन.पुरव मार्ग, चुनाभट्टी, मुंबई -400 022.

# खासगी वाहतुकीची लूट थांबणार भाडेवाढ रोखण्यासाठी विशेष समिती

■ मुंबई

**राज्यात** खासगी प्रवासी बस वाहतूकदारांकडून केली जाणारी बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाईल ॲप्सद्वारे प्रवाशांची होत असलेली आर्थिक पिळवणूक याबाबत वाढत्या तक्रारींची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विशेष समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

मंत्रालयात झालेल्या बैठकीत सह परिवहन आयुक्त आणि 'सुराज्य अभियान'मधील तीन प्रतिनिधींचा समावेश असलेली ही समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही समिती खासगी बसच्या भाडेवाढीवर नियंत्रण, अवैध बुकिंग ॲप्सवर कारवाई आणि प्रवाशांच्या तक्रारींवर प्रभावी उपाययोजना सुचविणार आहे. समितीचा सविस्तर अहवाल सादर झाल्यानंतर पुढील बैठकीत त्यावर निर्णय घेण्यात येणार असून, शिफारशींची तातडीने अंमलबजावणी केली जाईल, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले. सरनाईक म्हणाले की, सध्या अनेक खासगी ट्रॅव्हल्स कंपन्या अनधिकृत ॲप्सच्या माध्यमातून बुकिंग करत असून सण-उत्सव आणि सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा भाडे आकारले जाते. प्रवाशांची आर्थिक लूट करणाऱ्या अशा वाहतूकदारांवर कठोर कारवाई केली जाईल आणि कोणत्याही परिस्थितीत ही लूट सहन केली जाणार नाही. परिवहन विभागाने नावे बदललेल्या गावांबाबत आणि शुद्ध मराठी भाषेच्या वापराबाबत परिपत्रक काढून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावे.

# सीबीएसई बारावीचा निकाल जाहीर! यंदाही मुलींची सरशी

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यंदाही मुलींनीच उत्तुंग कामगिरी करत निकालात बाजी मारली आहे. यंदाचा एकूण निकाल ८५.२० टक्के लागला आहे. सीबीएसईच्या माहितीनुसार, यंदा आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स या तिन्ही शाखांमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले असून, एकूण निकालातही चांगली वाढ आहे. दरम्यान, गुणांबाबत शंका असल्यास उत्तरपत्रिकेची प्रत व पुनर्मूल्यांकनासाठीची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे. निकालानंतर विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षण, प्रवेश प्रक्रिया आणि करिअर नियोजनाला आता वेग येणार आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**स्वारस्य अभिव्यक्ती सुचना**

खालील कामांसाठी अनुभव असलेल्या कंत्राटदार यांना कुशल कामगार पुरविण्याहेतू इच्छुक असलेल्या कंत्राटदाराकडून त्यांची पात्रता यादी तयार करुन काम करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज मागवित आहोत.

| | |
|---|---|
| १. | 'ए' विभागातील महात्मा ज्योतिबा फुले मंडई (फेज-२) येथे सुरक्षारक्षक पुरविणेबाबत. |

इच्छुक अनुभव असलेल्या कंत्राटदार याबाबतचा तपशिल, अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी सहा. अभियंता (घ.क.व्य.) 'ए' विभाग यांच्याकडे पुढील पत्त्यावर संपर्क साधावा. सहा. आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४ ई, पहिला मजला, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

सदर संस्थांची विभाग कार्यालयात स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज सादर करण्याची अंतिम तारिख २१.०५.२०२६ (दु. ०१.०० वाजेपर्यंत).

सही/-
सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग

पीआरओ/३३८/जाहि./२०२६-२७

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई**

SRA/ARES/OW/2026/21584
सहकार कक्ष, झोपुप्रा, बृहन्मुंबई
जा.क्र. झोपुप्रा/सनिस/कार्यासन-१/टे.सी. ६/सन २०२६
दिनांक : १२/०५/२०२६

**-: विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस :-**

साई सेवा एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.), न. भू. क्रं. २७८ (पार्ट), सर्वे क्रं. ३७, राघूशेठ भाजीपाला वाडी, वा. तु. पाटील मार्ग, साईबाबत मंदीर जवळ, गोवंडी (पूर्व), मुंबई- ४०० ०८८ या योजनेचे विकासक मे. व्हिजन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा. यांनी दि.०८/०५/२०२३ रोजीचे कलम १३ (२) चे आदेशान्वये नियुक्ती रद्द केली आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने संस्थेच्या विकासक यांची नियुक्ती करणेसाठी योजनेत समाविष्ट असलेल्या झोपडीधारकांची विशेष सर्वसाधारण सभा घेणेसाठी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपुप्रा., बृहन्मुंबई यांनी दि. १२/०५/२०२६ रोजीचे पत्रान्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून माझी नियुक्ती केलेली आलेली आहे.

त्यास अनुसरुन नियोजित योजनेत समाविष्ट झोपडीधारकांची विशेष सर्वसाधारण सभा **दि. २८/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता, स्थळ: सवाई बॅन्क्वेट ॲण्ड लॉन, वामन तुकाराम पाटील मार्ग, अमर सिनेमाच्या समोर, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस योजनेत समाविष्ट झोपडीधारकांनीच आवश्यक त्या ओळखपत्रासह उपस्थित रहावे.

**-: सभेपुढील विषय :-**

**नियोजित संस्थेसाठी नविन विकासक व वास्तुविशारद नियुक्तीबाबत ठराव पारित करणे.**

दिनांक : १२/०५/२०२६
ठिकाण : मुंबई

सही/-
(आर. एन. हळदे)
प्राधिकृत अधिकारी तथा
प्राधिकृत अधिकारी श्रेणी- १, झोपुप्रा. मुंबई

१. सभेस योजनेत समाविष्ट झोपडीधारक पती /पत्नी या दोघांपैकी एकाच व्यक्तीस उपस्थित राहता येईल. इतर नातेवाईकांना अथवा प्रतिनिधींना उपस्थित राहता येणार नाही.
२. योजनेत समाविष्ट झोपडीधारकांनी स्वतःची ओळख होईल अशा ओळखपत्रासह (आधार कार्ड / निवडणूक ओळखपत्र / पॅनकार्ड इत्यादी) उपस्थित रहावे.
३. योजनेतील झोपडीधारकांनी सभागृहात प्रवेश देते वेळी त्यांनी त्यांची ओळख पटवून सभेच्या उपस्थिती नोंदवहीत स्वाक्षरी करुन व बायोमॅट्रीक पद्धतीने उपस्थिती नोंदविल्यानंतरच सभागृहात प्रवेश दिला जाईल.
४. सभेच्या कामकाजाचे प्राधिकरणामार्फत व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येईल.

प्रति,
श्री./श्रीम. .............................................. परि-२ अ.क्र. ..........
साई सेवा एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.), न. भू. क्रं. २७८ (पार्ट), सर्वे क्रं. ३७, राघूशेठ भाजीपाला वाडी, वा. तु. पाटील मार्ग, साईबाबत मंदीर जवळ, गोवंडी (पूर्व), मुंबई - ४०० ०८८

**संस्थेचे नोटीस बोर्डवर माहितीसाठी,**

साई सेवा एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.), न. भू. क्रं. २७८ (पार्ट), सर्वे क्रं. ३७, राघूशेठ भाजीपाला वाडी, वा. तु. पाटील मार्ग, साईबाबत मंदीर जवळ, गोवंडी (पूर्व), मुंबई - ४०० ०८८

# उरणच्या नाणेघाटमध्ये ऑडिओ गाईड टूरद्वारे डिजिटल पर्यटन

**उरण** - येथील नाणेघाट या ऐतिहासिक वारसा स्थळाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत १८ मे पासून ऑडिओ गाईड टूरद्वारे डिजिटल पर्यटनाचा नवा अध्याय सुरू करण्यात आला. या उपक्रमामुळे पर्यटकांना प्राचीन इतिहासाची सविस्तर व सुलभ माहिती मिळणार असून, वारसा संवर्धन व पर्यटन अनुभव अधिक समृद्ध होणार. या प्रकल्पामुळे प्राचीन काळातील महत्त्वाचा व्यापारी मार्ग असलेला नाणेघाट आता पर्यटकांना डिजिटल माध्यमातून इतिहास सांगणार आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL SRM invites online RFx (Ex. e-Tender) from the Registered Contractors for MAHATRANSCO e-Tendering (SRM) website for below mentioned work.

**3rd Call E-tender No./ RFx No. 7000039564 (3rd Call) - Name of work: "SAS Upgradation and Restoration of existing Protection & SCADA System at 132/33 kV Jawhar S/s"** **Estimated Cost:** Rs. 1,76,34,719.00 with **Tender Fees:** Rs. 5000/- + GST. **Date for Sale and Submission of the e-Tender Documents:** From 30.04.2026 @ 18:00 Hrs. to 25.05.2026 @ 18:00 Hrs. For detailed information visit our website: **https://srmetender.mahatransco.in** For detailed information visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**Protection, Automation and Communication Circle, Vashi**

**Government of Maharashtra**
**Forest Department**
**Mangrove Division- North Konkan**
Abhimaan II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W)- 400 602
Email- dfommcu@gmail.com
**Parent Portal: http://mahatenders.gov.in**
**E-Tender**

**Tender Notice No. DFO/MDNK/WM/02/2026-27.**

Online Tender Forms in B-1 Format, for the following work are invited by the Divisional Forest Officer, Mangrove Division- North Konkan, Abhimaan II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W)-400 602 from the contractors registered with the Government of Maharashtra in appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website **http://mahatenders.gov.in** from **14/05/2026 at 05.00 pm to 21/05/2026 at 05.00 pm.** Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors have to download tender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone no **022-69309286** during office hours.

All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available on the above said website. If any assistance is required regarding e-Tendering (uploading/ downloading) please contact NIC Help Desk number: **1800 3070 2232.**

| Sr. No | Name of work | Estimated cost | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form (Non-Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | Providing & Erecting Permanent Boundary Demarcation Pillars for Diversion of 130.6554 Ha Forest (Mangroves) Land for Proposed Versova to Bhyander DP Road by BMC at Village Pahadi Goregaon, Oshiwara, Versova & Juhu of Versova Beat West Mumbai Range of Mangrove Division North Konkan. | 25,50,528/- | 25,505/- | 4 Months. | Rs. 590/- (Including GST) |

1) No changes are to be made by the contractor in the tender documents published on the website. If any changes are made the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.
2) Right to reject any or all the tenders without assigning any reason there of is reserved.

sd/-
(Deepak P.Khade)
Divisional Forest Officer,
Mangrove Division North Kokan.

Contractor    No. of corrections    D.F.O. MDNK

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी ७७४

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई निविदा सूचना क्रमांक १६/२०२६-२०२७ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अंबरनाथ औद्योगिक क्षेत्र... जलशुध्दीकरण केंद्र जांभुळ येथील ३७५०० घ.मी. क्षमतेचा जलकुंभापासुन जवळील नाल्यापर्यंत पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी २००० मि.मी. व्यासाचे मायक्रोटनेलींगचे काम करणे. | ₹ ६,४७,७८,४७३.०० |

उपरोक्त कामाबाबतचे निविदा प्रपत्र दिनांक २०/०५/२०२६ ते दिनांक १५/०६/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक ०१/०६/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक ०८/०६/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



## 'गनमास्टर जी ९' येणार दसऱ्याला?

चित्रपट निर्माते दीपक मुकुट यांनी त्यांच्या आगामी प्रकल्पांबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली असून, इम्रान हाश्मीची मुख्य भूमिका असलेला 'गनमास्टर जी९' हा चित्रपट यंदा दसऱ्याच्या मुहूर्तावर प्रदर्शित करण्याचा त्यांचा मानस आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना पुन्हा एकदा ॲक्शन आणि थ्रिलरचा अनुभव मिळणार असून, इम्रानच्या एका वेगळ्या भूमिकेची उत्सुकता सध्या चित्रपट वर्तुळात आहे.

या संवादादरम्यान मुकुट यांनी त्यांच्या 'भूतनी' या चित्रपटाच्या बॉक्स ऑफिसवरील कामगिरीवरही भाष्य केले. हा चित्रपट अपेक्षित यश मिळवू शकला नाही, यामागचे मुख्य कारण म्हणजे स्क्रीन शेअरिंगच्या समस्या असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, अजय देवगणची मुख्य भूमिका असलेल्या 'रेड २' या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या वितरणाबाबतही त्यांनी स्पष्टता दिली. याची जबाबदारी 'पीव्हीआर आयनॉक्स पिक्चर्स'कडे सोपवण्यात आली आहे.

## जॅकलीनची 'माघार'

कथित ठग सुकेश चंद्रशेखरशी संबंधित २०० कोटी रुपयांच्या आर्थिक अफरातफर प्रकरणात अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिसने एक महत्त्वाचे पाऊल उचलले असून, या प्रकरणात 'साक्षीदार' (ॲप्रूव्हर) होण्याची आपली याचिका तिने मागे घेतली आहे. दिल्लीतील पतियाळा हाऊस न्यायालयात ही याचिका मागे घेण्यात आली. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) जॅकलीनच्या या अर्जाला तीव्र विरोध दर्शवला होता. सुकेशच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची कल्पना असूनही जॅकलीनने त्याच्याशी संबंध कायम ठेवले, असा दावा तपास यंत्रणेने न्यायालयात केला. 'ईडी'ने सादर



केलेल्या अहवालानुसार, सुकेश चंद्रशेखरकडून जॅकलीन आणि तिच्या कुटुंबियांनी महागड्या भेटवस्तू आणि इतर लाभ घेणे सुरूच ठेवले होते. हे सर्व फायदे गुन्ह्यातील पैशातून मिळवले गेल्याचा आरोप असून, जॅकलीनला या व्यवहारांची पूर्ण जाणीव होती असे 'ईडी'ने म्हटले आहे. विविध संवाद माध्यमांतून तिने सुकेशशी सातत्याने संपर्क ठेवल्याने, आपण निष्पाप आहोत हा तिचा दावा कमकुवत ठरतो, असेही तपास यंत्रणेने स्पष्ट केले. जॅकलीनने यापूर्वी आपण या प्रकरणात सहकार्य करण्यास तयार असून आपल्याला माफीचा साक्षीदार करावे, अशी मागणी अर्जाद्वारे केली होती. मात्र, 'ईडी'ने हा अर्ज संदिग्ध असल्याचे सांगत फेटाळण्याची मागणी केली होती. तपासाचा हा पेच आता अधिक गडद होण्याची शक्यता आहे.

## अर्जुनचे सडेतोड उत्तर

प्रसिद्ध अभिनेता अर्जुन रामपाल सध्या एका नव्या वादामुळे चर्चेत आला असून, त्याने आपल्या डीजे (डिस्क जॉकी) कौशल्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिले आहे. एका पार्टीतील त्याच्या सादरीकरणावरून सोशल मीडियावर टीका झाल्यानंतर, अर्जुनने आपला या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव जगासमोर मांडला आहे. या वादाला उत्तर देताना अर्जुनने स्पष्ट केले की, संगीत आणि डीजेइंग हे त्याच्यासाठी नवीन नसून वयाच्या १७ व्या वर्षापासून तो हे काम करत आहे. मी केवळ मनोरंजनासाठी हे करत नाही, तर मला संगीताची सखोल जाण आहे, असे त्याने नमूद केले. एखाद्या गोष्टीचा सराव आणि अनुभव असेल तरच ती गोष्ट आत्मविश्वासाने करता येते आणि आपल्याकडे ती क्षमता असल्याचे त्याने ठामपणे सांगितले. सोशल मीडियावर काही नेटकऱ्यांनी अर्जुनच्या डीजे कौशल्याची खिल्ली उडवली होती, ज्यावर प्रतिक्रिया देताना त्याने स्वतःचा बचाव केला. त्याने सांगितले की, अनेकदा लोक केवळ पूर्वग्रहातून टीका करतात, मात्र प्रत्यक्षात त्यामागील मेहनत त्यांना दिसत नाही. केवळ अभिनेता म्हणून नव्हे, तर एक कलाकार म्हणून आपल्याला विविध प्रयोग करायला आवडतात, असेही तो म्हणाला.



## अनुपियाचा संताप आणि आवाहन

अभिनेत्री अनुपिया गोएंका हिने सोशल मीडियावरील एका बनावट पोस्टवर तीव्र संताप व्यक्त केला असून, अशा प्रकारच्या पोस्टमुळे महिलांची प्रतिमा अत्यंत दुबळी आणि चुकीच्या पद्धतीने रंगवली जात असल्याचा आरोप तिने केला आहे. एका विशिष्ट इन्टीमेट सीनबाबत करण्यात आलेला दावा पूर्णपणे बिनबुडाचा असून, आपल्या संमतीशिवाय आणि सारासार विचाराशिवाय आपण कोणतीही कृती करत नाही, असे तिने स्पष्टपणे बजावले आहे.

अनुपियाच्या मते, सोशल मीडियावर व्हायरल झालेली ती पोस्ट केवळ दिशाभूल करणारी नसून ती अत्यंत खालच्या दर्जाची आहे. एखादी स्त्री आपली सीमा ओलांडून काहीही करेल, असे चित्र उभे करणे चुकीचे आहे. मला स्वतःची स्वतंत्र विचारशक्ती आहे आणि व्यावसायिक निर्णयांमध्ये माझा पूर्ण सहभाग असतो, अशा शब्दांत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या. अशा अफवांमुळे केवळ कलाकाराच्या प्रतिमेला तडा जात नाही, तर समाजासमोर स्त्रीची एक असहाय्य प्रतिमा उभी केली जाते, जी खेदजनक आहे, असेही ती म्हणाली. ही संपूर्ण घटना म्हणजे निव्वळ 'फेक न्यूज'चा प्रकार असून, प्रेक्षकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही अनुपियाने या निमित्ताने केले आहे.



## अनुष्का परतली हो...!

अभिनेत्री अनुष्का शर्मा प्रदीर्घ काळानंतर सार्वजनिक जीवनात परतली असून, तिच्या या पुनरागमनावरून समाजमाध्यमांवर सध्या संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. एका व्यावसायिक कार्यक्रमासाठी मुंबईत दाखल झालेल्या अनुष्काचा नवा लूक पाहून चाहते आणि नेटकऱ्यांमध्ये दोन गट पडल्याचे दिसून येत असून, यावरून इंटरनेटवर मोठी चर्चा रंगली आहे. काही नेटकऱ्यांनी अनुष्काचा चेहरा 'ओळखता येत नाही' (अनरेकग्निझिबल) अशी टिप्पणी करत



तिच्या चेहऱ्यावरील बदलांवर बोट ठेवले आहे. यामुळे तिच्या सौंदर्यावर आणि शक्य असलेल्या कॉस्मेटिक बदलांवरून टीका केली जात आहे. मात्र, या टीकेला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी अनुष्काचे चाहते मोठ्या संख्येने पुढे आले आहेत. आई झाल्यानंतर स्त्रियांच्या शरीरात नैसर्गिक बदल होतात, याचे भान टीकाकारांनी ठेवावे, अशा शब्दांत चाहत्यांनी तिची पाठराखण केली आहे.

अनुष्का शर्मा गेल्या अनेक महिन्यांपासून लंडनमध्ये वास्तव्यास होती. दुसऱ्या अपत्याच्या जन्मानंतर तिने सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर राहणे पसंत केले होते. नुकत्याच समोर आलेल्या छायाचित्रांमध्ये तिने पांढऱ्या रंगाचा स्टायलिश शर्ट आणि डेनिम परिधान केली होती. काहींनी तिच्या चेहऱ्यावरचा 'ग्लो' मॅच्युरिटी दर्शवतो असे म्हटले आहे, तर काहींनी तिला ट्रोल करण्याचा प्रयत्न केला आहे. अनुष्का 'चकदा एक्स्प्रेस' या चित्रपटाद्वारे पडद्यावर पुनरागमन करणार आहे. भारतीय क्रिकेटपटू झुलन गोस्वामी यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट प्रदर्शनाच्या प्रतीक्षेत आहे. प्रदीर्घ विश्रांतीनंतर अनुष्का पुन्हा सक्रिय झाल्याने तिच्या आगामी प्रकल्पांबाबत चित्रपटसृष्टीत उत्सुकता वाढली आहे.

## विंटेज अवतारात अक्षय

बॉलिवूडचा 'खिलाडी' अक्षय कुमार आपल्या आगामी 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटामुळे पुन्हा एकदा चर्चेत आला असून, या चित्रपटातील त्याच्या एका खास लूकची सध्या चित्रपटसृष्टीत जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यानचे अक्षयची काही छायाचित्रे समोर आली असून, त्यामध्ये तो अत्यंत रांगड्या आणि विंटेज अवतारात दिसत आहे. या नव्या शैलीमुळे प्रेक्षकांमध्ये चित्रपटाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली आहे.

या चित्रपटाच्या निमित्ताने अक्षय कुमार दीर्घकाळानंतर एका मोठ्या विनोदी चित्रपटात झळकणार आहे. समोर आलेल्या छायाचित्रांमध्ये अक्षयने गडद रंगाचा पोषाख आणि डोळ्यांवर चष्मा परिधान केला असून, त्याच्या चेहऱ्यावरील



भाव आणि एकूण देहबोली ही ९० च्या दशकातील एखाद्या क्लासिक ॲक्शन नायकाची आठवण करून देणारी आहे. अंगावर खाकी रंगाचे जॅकेट आणि विस्कटलेले केस असा त्याचा हा 'रग्ड' अवतार सोशल मीडियावरही चांगलाच पसंत केला जात आहे.

'वेलकम टू द जंगल' हा 'वेलकम' मालिकेतील तिसरा चित्रपट असून, अहमद खान या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. या चित्रपटात अक्षय कुमारसह अर्शद वारसी, संजय दत्त, जॅकलिन फर्नांडिस, दिशा पटानी आणि इतर अनेक दिग्गज कलाकार एकाच वेळी पडद्यावर दिसणार आहेत.चित्रपटाचे बहुतांश चित्रीकरण हे निसर्गरम्य व जंगलाच्या पार्श्वभूमीवर होणार असल्याने अक्षयचा हा नवा लूक कथेशी मिळताजुळता असल्याचे बोलले जात आहे. हा चित्रपट ख्रिसमसच्या मुहूर्तावर प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

## वैद्यकीय कारणास्तव गोयलना इंग्लंडला जाण्याची परवानगी

■ मुंबई

**मनी** लॉन्डरिंग प्रकरणाच्या चौकशीला सामोरे जात असलेल्या नरेश गोयल यांना विशेष पीएमएलए न्यायालयाने वैद्यकीय कारणास्तव चार आठवड्यांसाठी लंडनला जाण्याची परवानगी दिली आहे. तज्ञ वैद्यकीय मदत घेण्यासाठी परदेशात जाण्याचा अधिकार हा संविधानाने दिलेला मूलभूत मानवी हक्क आहे, असे न्यायालयाने नमूद केले.

गोयल यांच्या वतीने ज्येष्ठ वकील आबाद पोंडा यांनी न्यायालयात सांगितले की, गोयलना अनेक जीवघेण्या आजारांनी ग्रासले असून पत्नीच्या निधनानंतर ते गंभीर नैराश्यात गेले आहेत. त्यामुळे परदेशातील तज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

याला ईडीने विरोध करताना गोयल हे सार्वजनिक निधीशी संबंधित मोठ्या आर्थिक फसवणुकीचे मुख्य सूत्रधार, नियंत्रण करणारे प्रमुख व्यक्ती आणि प्रमुख लाभार्थी असल्याचा दावा केला. मात्र, न्यायालयाने एचसीए हेल्थ केअर वेलिंग्टन हॉस्पिटल, लंडन यांनी जारी केलेले पत्र विचारात घेतले. त्यानुसार गोयल यांची २७ मे रोजी सायंकाळी ४ वाजता वैद्यकीय तपासणी निश्चित करण्यात आली आहे.

## सांगली मंदिर दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना ४ लाख मदत जाहीर

■ सांगली

**सांगली** जिल्ह्यातील जत तालुक्यातील मोटेवाडी येथे काल सायंकाळी मरगुबाई मंदिर परिसरात वादळी वारा आणि पावसामुळे भिंत कोसळून सहा भाविकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत १० ते १२ जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जत येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. प्रशासनाकडून तातडीने मदत आणि पंचनामा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वादळी वाऱ्यासह अचानक सुरू झालेल्या पावसामुळे मंदिर परिसरात उपस्थित भाविकांनी भिंतीचा आश्रय घेतला होता. मात्र, जोरदार वाऱ्यामुळे ती चिरा-विटांची भिंत अचानक कोसळली आणि मोठी दुर्घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पोलीस, तहसीलदार आणि स्थानिक प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. जखमींना रुग्णालयात हलवले.

## कोस्टल रोडवर सिंगापूर, बँकॉकची थीम वापरून ग्रीन नेकलेसचा साज देणार

### रिलायन्स फाऊंडेशन हरित क्षेत्र साकारणार

■ मुंबई

**मुंबईत** हरित क्षेत्र निर्माण करण्यावर पालिका प्रशासनाने भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून कोस्टल रोडवर हरित क्षेत्र साकारण्यात येत आहे. विशेष म्हणजे हरित क्षेत्रासाठी सिंगापूर बँकॉकची थीम वापरली जाणार असून कोस्टल रोडला 'ग्रीन नेकलेस'चा साज देण्यात येणार आहे.

रिलायन्स फाऊंडेशनच्या वतीने कोस्टल रोडवर हरित क्षेत्र साकारण्यात येणार आहे. रिलायन्स फाऊंडेशनच्या प्रतिनिधींनी सिंगापूर, बँकॉक येथील उद्यानांची पाहणी केली, त्याठिकाणी कशा प्रकारचे साहित्य वापरले जाते, कुठली झाडे किती वर्षे टिकतात, याचा अभ्यास करण्यात आला. हरित क्षेत्र विकसित करण्यासाठी महापालिकेने आराखडा तयार केला आहे. ५५ हेक्टरपैकी २१.५० हेक्टरवर तूर्तास ३० हजार रोपे लावण्यात येणार आहेत. सहा ते नऊ फूट उंचीची १५ हजार रोपे, तर एक ते दीड फुटाची १५ हजार रोपे लावण्यात येतील. यामध्ये समुद्र फूल, बनियान ट्री यासह विविध प्रजातीची भारतीय रोपे पावसाळ्यात व त्यादरम्यान लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी ४०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. परंतु हा खर्च सीएसआर फंडातून केल्यास पालिकेच्या निधीची बचत होणार असल्याने सीएसआर फंडातून हरित क्षेत्र निर्माण करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. हरित क्षेत्र साकारण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशनने रस दाखवला आहे.

मरीन ड्राइव्ह ते वरळी सी-लिंक दरम्यान कोस्टल रोड मार्गाच्या दोन्ही बाजूला तसेच येणाऱ्या पर्यटकांसाठी योगा ट्रॅक, ओपन जिम, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान, लहान मुलांसाठी उद्यान, सायकल ट्रॅक आणि जॉगिंग ट्रॅक, खुले प्रेक्षागृह आदी सुविधा असणार आहेत.

## बदलापुरात प्रशासनाकडून उघड्यावर मासे विक्रीवर बंदी

■ बदलापूर

**बदलापूर** शहरात प्रशासनाने उघड्यावर मासे विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील विविध भागांत रस्त्याच्या कडेला होणाऱ्या बेकायदेशीर मासळी विक्रीमुळे दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्यविषयक समस्या निर्माण होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने येत होत्या.

शहरात ठिकठिकाणी बसणाऱ्या मच्छी विक्रेत्यांमुळे दुर्गंधी आणि अस्वच्छता वाढत असल्याचा आरोप करत माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे यांनी कारवाईचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मासळी विक्रेत्यांना निश्चित केलेल्या जागेवरच व्यवसाय करण्याचे आदेश दिले आहेत. शहरात स्वच्छ भारत अभियान आणि स्वच्छता मोहिमेला गती देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या घाणीवर नियंत्रण ठेवणे हा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## भटके विमुक्त विकास परिषद सदस्यांची राज्यपालांसोबत चर्चा

■ मुंबई



**भटके** विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धव काळे यांच्यासह परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे भेट घेऊन राज्यातील अतिमागास भटक्या विमुक्त समाजातील लोकांच्या विविध समस्यांबाबत चर्चा केली.

राज्यातील अतिमागास भटक्या विमुक्त समाजातील प्रतिनिधींना आपण लोकभवन येथे निमंत्रित करुन त्यांच्या समस्या जाणून घेऊ, असे आश्वासन राज्यपालांनी शिष्टमंडळाला सांगितले. यावेळी शिष्टमंडळाने भटक्या विमुक्त समाजाच्या शिक्षण, आरोग्य, सरकारी नोंदीसंबंधी कागदपत्रे आदी प्रश्नांवर चर्चा केली. परिषदेने राज्यपालांना यमगरवाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा धाराशिव येथील एकलव्य विद्या संकुल येथे भेट देण्याचे निमंत्रण दिले. तसेच ३१ ऑगस्ट या विमुक्त दिनानिमित्त जातीचा दाखला, आधार कार्ड आदी कागदपत्रे वितरणाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. यावेळी भटके विमुक्त विकास परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय पुरी, कार्यवाह नरसिंग झरे, कोषाध्यक्ष नरेश पोटे, विदर्भ संयोजक राजेंद्र दोनाडकर, प्रांत सहसंयोजक शरद मखर व राहुल चव्हाण आदी उपस्थित होते.

## महारेलचे एमआरव्हीसी विलीनीकरण होणार नाही

■ मुंबई

**राज्य** सरकारने 'महारेल'चे 'एमआरव्हीसी'मध्ये विलीनीकरण करण्याचा रेल्वे बोर्डाचा प्रस्ताव स्पष्टपणे फेटाळून लावला. या निर्णयामुळे दोन्ही संस्थांचे स्वतंत्र अस्तित्व कायम राहणार असून, मुंबईच्या रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील केंद्र-राज्य समन्वयावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

राज्य सरकारने केंद्राच्या प्रस्तावाला नकार देताना स्पष्ट केले की, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (महारेल) ही संस्था राज्य सरकारच्या नियंत्रणाखालीच स्वतंत्रपणे कार्यरत राहील. केंद्र सरकारने यातून आपली गुंतवणूक काढून घेण्यास राज्याची हरकत नसल्याचे रेल्वे मंत्रालयाला कळवले आहे. सध्या 'महारेल' हे गृह (परिवहन) विभागाच्या अखत्यारित कार्यरत आहे, मात्र आगामी काळात ही संस्था सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) नियंत्रणाखाली आणली जाऊ शकते.

## बोरघाटात बसचा अपघात! आठ प्रवासी जखमी

■ पुणे

**मुंबई-पुणे** एक्स्प्रेसवेवरील बोरघाट परिसरात आज अपघात झाला. खंडाळा घाट उतरताना मंकी हिलजवळील बॅटरी पॉईंट परिसरात मिनी बस उलटल्याने आठ जण जखमी झाले. या घटनेमुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

जखमींमध्ये कस्तुरी गणेश माळी (१५), कमलाबाई रामचंद्र माळी (७०), गुरुनाथ जयराम डोंगरे (५५), मीनाबाई गुरुनाथ डोंगरे, गुलाबबाई दत्तात्रय हुमणे, रवींद्र रामचंद्र माळी (५०) आणि अशोक जयराम डोंगरे `(६०) यांचा समावेश आहे. हा अपघात अमृतांजन पुलाच्या वरच्या बाजूला, जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील एचओसी पुलाजवळ घडला. अपघाताची माहिती मिळताच आयआरबी प्रशासन, खासगी रुग्णवाहिका, देवदूत यंत्रणा आणि स्थानिक मदत पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.



जखमींना त्वरित खोपोली नगरपरिषद रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुदैवाने, बहुतांश प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या असून सर्व जखमी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील शेळके पाडा परिसरातील रहिवासी आहेत.

## नवापूरमध्ये बर्ड फ्लूचा कहर लाखो कोंबड्या आणि अंडी नष्ट

■ नंदुरबार

**नंदुरबार** जिल्ह्यातील नवापूर परिसरात बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असून प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर कोंबड्या नष्ट करण्याची मोहीम सुरू केली आहे. परिस्थिती गंभीर होत असल्याने पोल्ट्री फार्ममध्ये कडक उपाययोजना राबवल्या जात आहेत.

आतापर्यंत परिसरातील सुमारे ३ लाख ८९ हजार कोंबड्या नष्ट करण्यात आल्या असून २१ लाख ६१ हजारांहून अधिक अंडी नष्ट केली आहे. त्याचबरोबर सुमारे ५० टन पक्षी खाद्यही नष्ट करण्यात आले आहे. सहा पोल्ट्री फार्ममधील नमुने बर्ड फ्लू पॉझिटिव्ह आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. नवापूर तालुक्यातील ३५ पैकी १४ पोल्ट्री फार्ममध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. उर्वरित फार्ममधून नमुने तपासणीसाठी भोपाळ येथील प्रयोगशाळेत पाठवले आहेत. तर पशुसंवर्धन विभागाने पुढील काळात आणखी कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्याचे ऑपरेशन वाढण्याची शक्यता व्यक्त केली. यामुळे पोल्ट्री व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


## नॅशनल स्पॉट एक्स्चेंज घोटाळा प्राइमझोन डेव्हलपर्सला दणका

### मालमत्ता जप्तीचा निर्णय कायम

■ मुंबई

**नॅशनल** स्पॉट एक्स्चेंज लिमिटेडमधील (एनएसईएल) कोट्यवधी रुपयांच्या घोटाळा प्रकरणात उच्च न्यायालयाने प्राइमझोन डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडला मोठा दणका दिला. न्यायालयाने ही कंपनी व त्यांच्याशी संबंधित हरियाणामधील मालमत्तांच्या जप्तीचा निर्णय कायम ठेवला आणि कंपनीचे अपील फेटाळून लावले. यापूर्वी विशेष एमपीआयडी न्यायालयाने दिलेला मालमत्ता जप्तीचा आदेश उच्च न्यायालयाने योग्य ठरवला. नॅशनल स्पॉट एक्स्चेंजमध्ये सुमारे ५,६०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे उघडकीस आले. आरोपी संजीव अग्रवालने बेकायदेशीरपणे मिळवलेले ३१ कोटी रुपये 'प्राइमझोन डेव्हलपर्स' या कंपनीत गुंतवल्याचा आरोप आर्थिक गुन्हे शाखेने केला होता. या पैशातून हरियाणातील कर्नाल जिल्ह्यातील 'प्राइम रेसिडेन्शिअल' आणि 'प्राइम सिटी' यांसारखे मोठे गृहप्रकल्प उभारले जात होते. संबंधित मालमत्तांवर राज्य सरकारने महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण (एमपीआयडी) कायद्यांतर्गत टाच आणली होती. ६ फेब्रुवारी २०१८ रोजी विशेष न्यायालयाने ती जप्ती कायम ठेवण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशाला प्राइमझोन डेव्हलपर्सने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. याप्रकरणी न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. संजीव अग्रवालने एनएसईएल घोटाळ्यातील ३१.१० कोटी रुपये फिरवून प्राइमझोन डेव्हलपर्सच्या प्रकल्पांसाठी जमीन खरेदी करण्यासाठी वापरल्याचे मान्य केले होते, त्याची नोंद खंडपीठाने घेतली.

# नवाकाळ शब्दकोडे–१६०५



**आडवे शब्द –**

१. मूर्ख, अजिबात हुषारी नसलेला ४. इशारा ८. स्वर्गातले पेय १२. नवरदेव १४. महडच्या गणपतीचे नाव १७. मार्गस्थ १९. धनलाभ २०. तांदळाची एक जात २२. अपराध्याच्या वतीने भीड घालणे २४. तुकडा, करवंटी २७. कावळा २९. वायू ३०. तृतीया ३२. राजाचा लेखनिक ३४. कंटाळा ३५. कपर्दिक ३६. आजार ३८. वरण, भात, पोळी, भाजीचा समावेश असलेले संपूर्ण जेवण ३९. दिलेली वेळ पाळणारा ४१. कलिका ४२. फौंटनपेनचे टोक ४३. कुचेष्टा करण्याची सवय असलेला ४५. लीलया ४७. धूम्रपानाचा एक स्वस्त प्रकार ४८. उणे ५१. आरूढ ५२. पूर्वजांकडून प्राप्त ५४. रूप बदलणे ५६. बर्लिनच्या भिंतीने अनेक वर्षे विभागलेला देश ५८. कलंक, दागिना ६०. विनयी ६१. पद्य रचना ६३. फुलांचा अलंकार ६५. देवाला सोडलेला बैल ६७. बदनामी, टीका ६८. देऊळ ७०. नवी पालवी, तारुण्याचा बहर ७१. खूप ७३. खिन्न ७५. सूर्य ७७. पोळीभाकरी भाजण्याचे पात्र ७९. प्रामाणिकपणा ८१. काचेची बाटली ८२. नोकर ८४. आंब्याचे बन ८६. उणे ८७. प्रामाणिक, सभ्य ८९. जास्त किंमतीचे ९०. गीते रचणारा ९२. श्वासोच्छ्वास ९४. जामात ९६. अधीन ९७. कट्टा ९८. लाकूड ९९. मर्कट १०१. शिल्लक १०२. टोचणी १०३. प्रत्येक १०४. अफवा १०५. विशेष १०६. भीती १०८. स्त्रियांचा पंजाबी पोशाख १११. जखमी ११२. फोटोसाठी घेतलेली मुद्रा(इं.) ११३. भविष्यातील ११४. चामखीळ ११५. सौम्य धोरण ११६. बोजवारा उडणे

**उभे शब्द –** १. 'निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू ...' (समर्थ रामदासांनी केलेले शिवबांचे वर्णन) २. किंचितही अंश ३. पराक्रमी ५. फक्त, निव्वळ ६. होडी ७. सगळ्यांचा आवडता वार ८. सुविधा ९. बारापैकी एक रास १०. घरगुती शीतपेय ११. हिमाचलमधील कुलू नजीकचे थंड हवेचे ठिकाण १३. सत्य, अनुभवसिद्ध १५. गवताची एक जात, धार्मिक कृत्यांमध्ये याचा वापर करतात १६. अपात्र १८. मतभेद, वादंग २०. मठ्ठ्याबरोबर खाण्याचे पक्वान्न २१. ध्येय २३. औषध २५. मेथीची चव २६. आकाश २८. फुरसत ३१. दहशत ३३. कोकण, गोव्यातील दैवत- XXX नाथ ३४. विलंब ३७. वल्गना ४०. समेट, युद्धबंदी ४१. तख्तपोशी ४४. भाजी-आमटीसाठी ताटातील पात्र ४५. हा प्राणी स्वतःचा रंग बदलू शकतो ४६. प्राण ४७. क्रिकेटची बॅट या झाडाच्या लाकडापासून बनवतात ४८. जहागीरदार ४९. अंगीकार ५०. कासवाच्या गतीने ५३. वाहनात सामान ठेवण्याची जागा ५५. आवाज ५७. निद्रा ५९. तण ६२. ख्रिस्ती भिक्षुणी ६४. उसाचा आटवलेला रस ६६. निर्मिती ६९. दीपक ७२. फजिती करणे, टर उडवणे ७३. जोराचा निःश्वास ७४. नेहमी ७६. हौतात्म्य ७८. युद्ध ८०. हरिदास ८३. देवापुढचा दिवा ८४. गगन ८५. देव ८८. उणे ९१. गहू, वेळू इ.चे सत्त्व ९३. उपवासाला चालणारी फळभाजी ९५. बुबुळांचा आजार ९७. संगोपन करणारा ९९. पश्चिम १००. रडकथा १०१. मुरली १०२. श्रेष्ठ १०३. उपस्थित १०४. व्यर्थ १०५. खवखवणारा अळू १०७. पत्त्यांचा एक खेळ १०९. डावा ११०. बारावी रास १११. त्वरा ११२. गोणपाट ११३. या दिवशी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०४ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. रात्रीचा दिवस करणे ७. समिधा ९. धाप ११. धाटणी १२. धूर १३. बिल्ला १४. बाबागाडी १६. वन्ही १८. काक २०. पान २२. पसा २३. भूतां परस्परे पडो मैत्र जीवांचे २७. गार २८. गलबत २९. टाच ३०. तातडी ३३. तर ३४. कसकस ३७. आव ३८. शकट ४०. सुरमा ४१. कच्छप ४२. पराधीन ४४. हार ४७. वनमाळी ४९. डाग ५१. रडतराऊत ५४. सकस ५६. हूड ५७. पौत्र ५८. नात ५९. माला ६०. हानी ६१. पार ६२. ब्याद ६३. भकास ६५. बेत ६६. बरा ६७. थोतांड ७०. तरफदारी ७२. बखेडा ७३. जरब ७४. पेठा ७५. गीजर ७६. तयारी ७८. घबाड ७९. डाकू ८१. वासुकी ८२. सम ८३. हेर ८४. जंग ८५. पगार ८६. खंजीर ८८. खार ९०. आंबा ९२. धूसर ९४. दरबार ९७. रहिवास ९९. मनस्वी १०१. फटकळ १०३. राक्षस १०५. शुंभ १०६. टाहो १०७. यमल १०८. दणका १०९. कहर ११०. रेघ

**उभे शब्द** : १. उधार २. राणीवसा ३. चाक ४. वधू ५. सरकार ६. रण ७. सल्ला ८. धाबा ९. धागा १०. पडीक १३. बिनडोक १५. बालवाडी १७. पीतांबर १९. कस्पटासमान २०. पाप २१. पात्रता २२. पर २३. भूलतज्ज्ञ २४. पत २५. रेचक २६. जितराप २७. गाय शहाणी ३१. पवनपुत्र ३२. बोट ३४. करवत ३५. सकळीक ३६. बापडा ३७. आधी ३९. कर ४३. राजा ४५. बूड ४६. तेरा ४८. मासला ५०. गहू ५१. रत ५२. तडकाफडकी ५३. ऊर ५५. सहारा ५७. पौर ५८. नाद ५९. मातबरी ६१. पाड ६२. ब्याडगी ६३. भर ६४. सदा ६६. बडा घर ६७. थोर ६८. तांबडा ६९. काठावर पास होणे ७०. तरवार ७१. रीतसर ७३. जडजंबाल ७७. याम ८०. कूप ८७. जीवन ८८. खारट ८९. जोर ९१. हरभरे ९३. सफल ९४. दळण ९५. बारा ९६. रक्षक ९८. वाटा ९९. मठ्ठा १००. स्वीय १०२. कद १०४. सह

## पेट्रोल-डिझेलची दरवाढ अटळ पेट्रोलियम मंत्र्यांचे स्पष्ट संकेत

पान १ वरून

बोलण्याचा अर्थ दरवाढ अटळ आहे हाच होता. गेल्या चार वर्षांत कच्च्या तेलाच्या किमती ५० टक्क्यांनी वाढूनदेखील पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सरकारने वाढ केलेली नाही. त्यामुळे तेल कंपन्यांना सध्या पेट्रोलवर प्रति लीटर १४ रुपये, डिझेलवर ४२ रुपये तर स्वयंपाकाच्या गॅसवर प्रति सिलिंडर ६७४ रुपये तोटा सहन करावा लागत आहे, असे सांगत पुरी यांनी दरवाढ करणे कसे आवश्यक आहे ते पटवून देण्याचा प्रयत्न केला. दरम्यान इंधन महाग होण्यापूर्वीच इंधन टंचाईचे संकट ओढवले आहे. पेट्रोल पंपांवर इंधन संपले असल्याच्या पाट्या झळकत आहेत. एकूणच स्थिती गंभीर झाली आहे.

## एटीएसचे राज्यभर छापे

पान १ वरून

गुन्हेगारी कारवायांकडे वळवण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

गेल्या काही महिन्यांत दहशतवादी भरती आणि हेरगिरीशी संबंधित काही प्रकरणांत भट्टीचे नाव समोर आल्यानंतर केंद्रीय आणि राज्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. त्यानंतर महाराष्ट्र एटीएसने स्वतंत्र तपास सुरू केला होता. या तपासातून काही तरुण भट्टीच्या संपर्कात असल्याची माहिती मिळाल्याने राज्यभर ही धडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईदरम्यान काही संशयितांकडून मोबाईल फोन, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली आहे. संबंधित तरुणांना कोणत्या माध्यमातून संपर्क साधला गेला, त्यांना कोणत्या प्रकारचे संदेश देण्यात आले आणि त्यामागील उद्देश काय होता, याचा तपास यंत्रणा घेत आहेत.

## डोक्यावर हात ठेवून उपचाराचा दावा चार भोंदू मुंबई पोलिसांच्या अटकेत

मुंबई

**केवळ** डोक्यावर हात ठेवून आजार बरा करण्याचा दावा करत अंधश्रद्धा पसरवणाऱ्या भोंदूंच्या टोळीवर मुंबई पोलिसांनी कारवाई करत चौघांना अटक केली आहे. या प्रकरणामुळे शहरात खळबळ उडाली आहे. सांताक्रूझ पूर्व येथील आशा उपाध्याय (४५) यांनी मालाड पोलिसांत तक्रार दाखल केली.

गेल्या सात वर्षांपासून थायरॉईड आणि उच्च रक्तदाबाने त्रस्त असलेल्या आशा यांच्याकडे उषा गुप्ता ही महिला ८ मे रोजी तीन अनोळखी महिलांसह आली होती. यावेळी प्रभू येशू यांच्या प्रार्थनेने सर्व आजार बरे होतात असा दावा करत त्यांनी आशा यांना मालाड पश्चिम येथील एका शाळेत दर रविवारी होणाऱ्या प्रार्थना सभेला येण्याचे आमंत्रण दिले. या दाव्याबाबत संशय आल्याने आशा उपाध्याय यांनी ही बाब आपल्या मुलाला सांगितली. त्यानुसार १० मे रोजी त्यांचा मुलगा संबंधित ठिकाणी गेला असता, तेथे रमेश गुप्ता हा व्यक्ती लोकांच्या डोक्यावर हात ठेवून आजार बरे केल्याचा भास निर्माण करत असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. त्याने या प्रकाराचे चित्रिकरण करण्याचा प्रयत्न केला असता त्याला रोखण्यात आले. यानंतर त्याने पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधत तक्रार केली. त्यावरून मालाड पोलिसांनी रमेश गुप्ता, उषा गुप्ता, अमन दुबे, मुकेश यादव आणि तीन अज्ञात महिलांविरोधात अंधश्रद्धा पसरवणे, फसवणूक आणि धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

## मुंबई-आग्रा महामार्गावर अपघात चालकाला हृदयविकाराचा झटका

नाशिक

**मुंबई-आग्रा** राष्ट्रीय महामार्गावर आज अपघात घडला. नाशिकहून मालेगावकडे जाणाऱ्या एसटी बसच्या चालकाला गाडी चालवत असतानाच अचानक



हृदयविकाराचा झटका आल्याने बस रस्त्यालगतच्या झाडावर आदळली. बस नियमितप्रमाणे प्रवाशांना घेऊन मालेगावकडे जात होती. दरम्यान, चालकाला अचानक छातीत तीव्र वेदना होऊ लागल्या आणि हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे स्टिअरिंगवरील ताबा सुटून बस रस्त्यावरून खाली उतरली आणि झाडावर जाऊन आदळली. धडकेनंतर बस पलटी झाली. हा अपघात उमराने गावाच्या शिवारात घडला. धडक इतकी जोरदार होती की, झाड मुळासकट उन्मळून पडले, तर बसचे मोठे नुकसान झाले. अपघातावेळी बसमध्ये सुमारे २५ ते ३० प्रवासी होते. चालकासह ७ ते ८ जण जखमी झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातानंतर बसमधील काचा फुटल्या आणि मोठा आवाज झाल्याने परिसरातील ग्रामस्थ व इतर वाहनचालक तातडीने मदतीसाठी धावले.

## रेल्वे भरती मारहाण प्रकरण माझा संबंध नाही! राज ठाकरेंचा जबाब

पान १ वरून

यांच्यासह इतर आरोपींचेही जबाब नोंदवले. सुनावणीनंतर राज ठाकरे यांचे वकील विजय नांगरे यांनी सांगितले की, आंदोलनावेळी राज ठाकरे नाशिकमध्ये होते. त्यांचा या गुन्ह्याशी थेट संबंध नाही. राज ठाकरे यांनी न्यायालयात स्पष्ट सांगितले की, त्यांचा या घटनेशी काहीही संबंध नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ मे रोजी होणार आहे. मात्र त्या दिवशी राज ठाकरे यांना वैयक्तिकरित्या उपस्थित राहण्याची गरज नसल्याचे वकिलांनी स्पष्ट केले. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या सुनावणीवेळी राज ठाकरे यांनी न्यायालयासमोर आपल्याला गुन्हा मान्य नसल्याचे सांगितले होते. न्यायालयीन प्रक्रियेला पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका मांडली होती.

२००८ साली रेल्वे भरती परीक्षेदरम्यान मनसेच्या कार्यकर्त्यांनी कल्याण रेल्वे स्थानकावर आंदोलन करत उत्तर भारतीय उमेदवारांना लक्ष्य केल्याचा आरोप आहे. मराठी तरुणांच्या नोकऱ्या परप्रांतीय घेत आहेत, या भूमिकेतून मनसेने आंदोलन छेडले होते. त्यावेळी काही कार्यकर्त्यांनी परीक्षार्थींना लाठ्या-काठ्यांनी मारहाण केल्याचा तसेच रेल्वेच्या मालमत्तेचे नुकसान केल्याचा आरोप पोलिसांनी ठेवला होता.

## तटकरे-पटेलांसह २२ आमदार भाजपात जाणार?

पान १ वरून

जय पवार यांना राष्ट्रीय सचिव म्हणून स्थान देण्यात आले. पण पक्षाचे प्रमुख चेहरे मानले जाणारे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि छगन भुजबळ यांची नावे या यादीतून गायब होती. यावर स्पष्टीकरण देताना सुनेत्रा पवार यांनी ही केवळ तांत्रिक आणि क्लेरिकल चूक होती, असे सांगितले. आता या दोघांची नावे आहेत ,पण त्यांना कोणतीही जबाबदारी दिलेली नाही.

अशात आसाम दौऱ्यावरून परतताना प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी सुनेत्रा पवार यांच्यासोबत प्रवास टाळला. दोघांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत प्रवास केला. आसामहून परतल्यानंतर तटकरे यांनी उशिरा रात्री शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीमुळे तटकरे आणि इतर नाराज नेते काही वेगळा राजकीय निर्णय घेणार का ? असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, तटकरे यांना महासचिव पदाबाबत प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी कोणतीही स्पष्ट भूमिका न मांडता मौन बाळगले. त्यामुळे त्यांच्या पुढील भूमिकेबाबतचा संभ्रम अधिकच वाढला आहे. अशा स्थितीत रोहित पवार यांनी केलेला गौप्यस्फोट आगीत तेल ओतणारा ठरला आहे.

## तामिळनाडूत थलापती विजय यांना पूर्ण पाठिंबा

पान १ वरून

विजय यांना पाठिंबा जाहीर केला. या दोन पक्षांचे मिळून चार आमदार आहेत. त्यानंतर व्हीसीक, इंडियन युनियन मुस्लीम लीग आणि काही अपक्ष आमदारांच्या पाठिंब्यावर विजय यांनी सरकार स्थापन केले. मात्र नियमानुसार त्यांना आज विधानसभेत बहुमत सिद्ध करणे आवश्यक होते. या सर्व घडामोडी होत असताना मंगळवारी अण्णा द्रमुक (एआयएडीएमके) पक्षात उभी फूट पडली. पक्षातून फुटलेल्या २५ आमदारांनी आज विजय यांच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे विजय यांना १४४ म्हणजे बहुमताच्या ११८ च्या आकड्याहून अधिक मोठा आकडा गाठता आला.

## अखिलेश यादव यांचे सावत्र बंधू प्रतीक यादव यांचे निधन

पान १ वरून

आढळला नसल्याचे सांगण्यात आले असले, तरी व्हिसेरा पुढील तपासासाठी जतन केला आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या नखांवर आणि शरीरावर निळसर-काळे डाग आढळल्याने मृत्यूबाबत संशय कायम आहे. प्रतीक यादव हे राजकीय घराण्यातील असूनही सक्रिय राजकारणापासून दूर राहिले. त्यांनी ब्रिटनमधील लीड्स विद्यापीठातून शिक्षण घेतले होते. ते रिअल इस्टेट आणि फिटनेस क्षेत्रात कार्यरत होते. लखनौमध्ये 'द फिटनेस प्लॅनेट' नावाचे जिम चालवत होते. 'जीव आश्रय' या संस्थेद्वारे ते भटक्या प्राण्यांच्या उपचार व देखभालीसाठी कार्यरत होते. त्यांची पत्नी अपर्णा यादव यांच्याशी त्यांचा काही काळ वाद सुरू होता. मी माझ्या पत्नीपासून घटस्फोट घेत आहे, असे त्यांनी एकदा समाजमाध्यमांवर टाकले होते आणि नंतर ते मागे घेतले होते. त्यांना व्यवसायातही मोठा तोटा झाला होता. यामुळे ते प्रदीर्घ काळ नैराश्यात होते.

**PUBLIC NOTICE**
**BEFORE THE HON'BLE STATE CONSUMER DISPUTE REDRESSAL COMMISSION**
Old Secretariate Extension Building, Ground Floor, M. G. Road, Kala Ghoda, Fort, Mumbai- 400 032
**First Appeal No. 236/2024**
Aaruhi Ravindra Jadhav & Ors ............. Appellants
Vs
The Children's Hospital and Ors... ....... Respondents
To,
**1. Dr. Krupali Kaku,**
**last known address**
**at c/o The Children's' Hospital, Mumbai, Shweta Khandelwal layout, Link Road, Malad (West), Mumbai 400 064.**
**2. Dr. Priyanka Halan**
**last known address**
**at c/o The Children's' Hospital, Mumbai, Shweta Khandelwal layout, Link Road, Malad (West), Mumbai 400 064.**
Whereas the notice was sent by Speed Post on 26.06.2024 to the abovementioned last known address of the abovenamed Respondents in the above-mentioned appeal case, the same were returned un-delivered.
Whereas on 24.02.2026, the Hon'ble State Consumer Redressal Commission passed an order directing the Appellants to file paper publication notice.
Therefore, the abovenamed Respondents are hereby informed through this Public Notice that they should remain present at the above-mentioned address on **10th June 2026 at 10.30 am** and file their respective Written Statements before the Hon'ble Commission. In case the Respondents do not remain present and appear before the Hon'ble Commission, in person or through their advocates, the Hon'ble State Consumer Redressal Commission may pass an ex-party order and take further action.
Date: 14.05.2026
Place: Mumbai
Advocate Gautam Shripad Dongre
Advocate for the Appellants
6, Dnyandevi, Sahitya Sahawas, MK Marg, Bandra East, Mumbai 400 051
Email: lawfirmofadvocatedongre@gmail.com
Mob:9820785268

## नीट प्रकरणी आणखी तिघे ताब्यात

पान १ वरून

न्यायालयाच्या देखरेखीखाली घ्यावी, अशी विनंती केली आहे. त्यामुळे हा प्रश्न आता अधिक गुंतागुंतीचा झाला आहे.

अहिल्यानगरमधून अटक करण्यात आलेला धनंजय लोखंडे हा मुख्य एजंट म्हणून तर ब्युटीपार्लर चालवणारी मनीषा वाघमारे विद्यार्थ्यांना गाठून त्यांना लोखंडेपर्यंत पोहोचवायचे काम करत होती. तसेच धनंजय लोखंडे याने शुभम खैरनार याला १० लाख रुपयांना प्रश्नपत्रिका विकली होती, असे प्राथमिक तपासात आढळून आले आहे.

खरेतर एनटीएने काल १२ मे रोजी पेपरफुटी झाल्याची कबुली देत परीक्षा रद्द केली आहे. पुन्हा परीक्षा घेण्यासाठी लवकरच एनटीए तारीख जाहीर करणार आहे. मात्र एफएआयएमएने दाखल केलेल्या याचिकेत एनटीएवर अविश्वास दर्शवण्यात आला आहे. एनटीएच्या कार्यपद्धतीवरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे. संचालक मंडळाची फेररचना करावी, अशी मागणी एफएआयएमएने केली आहे.

## दिल्लीसह मुंबई-पुण्यात युवक काँग्रेसची निदर्शने

नीट पेपरफुटी आणि परीक्षा रद्द झाल्याच्या निषेधार्थ युवक काँग्रेसने आज राजधानी दिल्लीसह मुंबई,पुणे आणि अन्य शहरांमध्ये जोरदार निदर्शने केली. याप्रसंगी नीटसारख्या स्पर्धा परीक्षेचा पेपर फुटतोच कसा, असा सवाल करत आंदोलकांनी मोदी सरकारचा निषेध केला.

दिल्लीत एनटीएच्या मुख्यालयावर चाल करून जाण्याचा आंदोलकांनी प्रयत्न केला. या ठिकाणी प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तसेच चार स्तरात बॅरिकेडिंग करण्यात आले होते. मात्र कार्यकर्ते बॅरिकेडस ओलांडून एनटीएच्या कार्यालयात जाण्याचा प्रयत्न करत होते. याप्रसंगी आंदोलक आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

मुंबईत नरिमन पॉईंट येथील सीईटीच्या कार्यालयासमोर युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. एनटीए आणि मोदी सरकारच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या, तर पुण्यात महाराष्ट्र राज्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली गुडलक चौक येथे निदर्शने करण्यात आली. धिक्कार असो,धिक्कार असो, मोदी सरकारचा धिक्कार असो, हाय हाय हाय हाय मोदी सरकार हाय हाय, आदि घोषणांनी आंदोलकांनी परिसर दणाणून सोडला. येथेही पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले.

राज्याच्या अन्य शहरांमध्येही युवक काँग्रेसच्या वतीने ठिकठिकाणी निदर्शने करण्यात आली.

## मतीन पटेलच्या घरावर बुलडोझर फिरवला

पान १ वरून

आपल्या घरात आश्रय दिल्याचा आरोप आहे. यानंतर ९ मे रोजी महानगरपालिकेने मतीन पटेल याचे नारेगाव येथील घर, ६ दुकाने आणि कैसर कॉलनी येथील निवासी इमारत या सर्व बांधकामांना अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस बजावली आणि ७२ तासांत उत्तर मागितले होते. त्यानंतर समाधानकारक उत्तर न मिळाल्याचा दावा करत प्रशासनाने आज सकाळी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली आणि ही सर्व बांधकामे बुलडोझर फिरवून जमीनदोस्त केली.

या कारवाईनंतर एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी नारेगाव परिसरात जाऊन नागरिक आणि समर्थकांशी संवाद साधला. त्यांनी उपस्थितांना शांतता आणि संयम राखण्याचे आवाहन केले. मी शेवटच्या आशेने येथे आलो आहे. पुढच्या वेळी येईन तेव्हा मतीन पटेल माझ्यासोबत असतील, असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांना धीर दिला. दुपारी ते पालिका आयुक्तांना भेटले. त्यांनी आयुक्तांकडे सत्तेतील भाजपा नगरसेवकांशी संबंधित शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची मागणी केली. तर त्यांनी प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित करत म्हटले की, आज घर पाडले गेले असले तरी पुन्हा ते उभे राहील. हा एमआयएमला राजकीयदृष्ट्या कमकुवत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पोलीस, सत्ता आणि प्रशासन त्यांच्या हातात आहे. आम्ही न्यायालयात जातो, पण न्यायालयाच्या निर्णयालाही किंमत दिली जात नसेल तर आम्ही न्याय कुठे मागायचा ? मतीन हा माझा विश्वासू माणूस आहे. कायदा सर्वांसाठी समान असेल तर त्याची अंमलबजावणीही समान पद्धतीने झाली पाहिजे. देशातील गुंडाराजला देशातील लोक त्रस्त झाले आहे. सरकारला सांगायचे आहे की, तुम्ही गुंडगिरी करून घर पाडू शकता, मात्र घर बांधण्याची ताकद आमच्यामध्ये आहे. ज्या माणसाचे घर पाडले त्याला आतापर्यंत दोषी ठरवलेले नाही. शहरात केवळ हे एकच घर अतिक्रमणात आहे का? शहरात सुमारे ४० टक्के अनधिकृत मालमत्ता आहे. ज्यामध्ये अनेक भाजपा नगरसेवकांची घरेदेखील आहेत. त्या संदर्भातली कागदपत्रे आमच्याकडे आहेत. त्यांना मार्च महिन्यात नोटीस गेली आहे. मग ती बांधकामे अद्याप का पाडली नाहीत? अतिक्रमण करणाऱ्या नगरसेवकांचे नगरसेवकपद रद्द करण्याचे आदेश स्वतः आयुक्तांनी दिलेले आहेत. मग त्यांचे घर का पाडण्यात आले नाही?

शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी जलील यांच्यावर टीका करत म्हटले की, आरोपीला पाठिंबा देण्यासाठी जलील सभा कशी घेतात? या संपूर्ण प्रकरणात त्यांनी निदा खानचे नाव घेतले नाही. जलील सर्वांचे मसिहा झाले असल्याचा भाव आणत आहेत. वास्तविक मतीन प्यादा असून निदाला शहरात आणण्यामागे जलीलच आहे. जर ते इस्लामला मानत असतील तर त्यांनी कुराणवर हात ठेवून निदा खानला मी शहरात आणले नसल्याचे सांगावे.

नवाकाळ

• मुंबई | गुरुवार १४ मे, २०२६ • पान -८

# सोनिया गांधी पुन्हा रुग्णालयात दाखल



**नवी दिल्ली -** काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांना पुन्हा एकदा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना किरकोळ शस्त्रक्रियेसाठी गुरुग्राम येथील मेदांता द मेडिसिटी रुग्णालयात दाखल केले आहे. काही दिवसांपूर्वीही तब्येतीच्या कारणास्तव त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता पुन्हा त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# १९७० चे दशक- दूरदर्शनचा काळ

**दूरदर्शन मुंबईत २ ऑक्टोबर १९७२ रोजी, गांधी जयंतीच्या दिवशी सुरू झाले. त्यावेळी माहिती व प्रसारण मंत्री असलेले इंदरकुमार गुजराल (नंतर पंतप्रधान झाले) यांनी उद्घाटनपर भाषण केले. या सेवेचा उद्देश शहर आणि राज्यातील लाखो लोकांना जोडणे, शिक्षित करणे आणि मनोरंजन देणे हा होता. पण प्रत्यक्षात दूरदर्शनने त्यापेक्षा खूप मोठा प्रभाव निर्माण केला. आजच्या भाषेत सांगायचे तर टीव्ही हे एक डिसरप्टिव्ह माध्यम ठरले. जरी प्रसारण दररोज फक्त काही तासांसाठी होत असे, तरी मुंबईकरांनी आपल्या आवडत्या कार्यक्रमांच्या वेळेनुसार दिनक्रम बदलण्यास सुरुवात केली. हे कार्यक्रम प्रसार भारतीच्या दूरदर्शन विभागामार्फत तयार केले जात होते.**

**दररोजचे** प्रसारण आठवड्याच्या दिवशी संध्याकाळी ६ वाजता सिग्नल बार चार्टने सुरू होत असे. त्यानंतर दूरदर्शनचा लोगो आणि त्याची खास धून ऐकू येत असे. त्या काळात सर्व प्रसारण कृष्णधवल होते.

दूरदर्शनच्या सुरुवातीमुळे ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही सेट, केबल्स आणि अँटेना तयार करणारा एक नवीन उद्योग निर्माण झाला. टीव्ही सेट लाकडी पेटीसारख्या चौकटीत असत, चार पायांवर उभे आणि स्लायडिंग किंवा फोल्डिंग दरवाजे असलेले. बहुतेक टीव्हींमध्ये चॅनेल बदलण्यासाठी नॉब असायचा, पण गंमत म्हणजे एकच चॅनेल उपलब्ध होता. टीव्ही सेट घेण्यासाठी परवाना आवश्यक होता आणि तो दरवर्षी स्थानिक पोस्ट ऑफिसमध्ये नूतनीकरण करावा लागत असे. यासाठी निरीक्षक घराघरांत तपासणीसाठी येत असत. टीव्ही अँटेना छतावर बसवले जात आणि सिग्नल बिघडला की, कोणीतरी वर जाऊन अँटेना नीट करायचा, तर खालील व्यक्ती खिडकीतून सांगत मार्गदर्शन करायची. ही प्रक्रिया त्रासदायक असली तरी आज ती गोड आठवण बनली आहे. काहीजण घरात V-आकाराचा अँटेना वापरत असत.

या सर्व अडचणी असूनही टीव्ही लवकरच लोकप्रिय झाला. कार्यक्रमांमध्ये शिक्षण, समाज आणि मनोरंजन यांचा समतोल होता. मुलांसाठी मॅजिक लॅम्प (इंग्रजी), किलबिल (मराठी), संताकुकडी (गुजराती) आणि खेळ खिलोने (हिंदी, मंजू सिंह सूत्रसंचालक) हे कार्यक्रम होते. यात प्रश्नमंजुषा, हस्तकला, कठपुतळी आणि गोष्टी सांगितल्या जात. इंग्रजी मालिकांमध्ये फायरबॉल एक्सएल५, इन्व्हिजिबल मॅन, मॅन इन अ सूटकेस, काउंट ऑफ मॉन्टे क्रिस्टो, सर फ्रान्सिस ड्रेक, हिअर्स ल्युसी, चार्ली चॅप्लिन, निकोलस निकलबाय, फादर डिअर फादर आणि जर्मन गेम शो टेले-मॅच यांचा समावेश होता. रामदास पाध्ये यांनी 'मेरी भी सुनो' या कार्यक्रमात 'अर्धवटराव' या बाहुलीसह प्रेक्षकांचे मनोरंजन केले.

फ्लिंटस्टोन्स तसेच फिल्म्स डिव्हिजनचे स्टॉप पुल चेन, स्किन इन द बिन, ट्री ऑफ युनिटी यांसारखे कार्टून्स सामाजिक संदेश देत असत. जरी त्यांची गुणवत्ता वॉल्ट डिस्नेच्या कार्टून्सइतकी नसली तरी ते प्रभावी ठरले.

छायागीत हा हिंदी चित्रपट गीतांचा कार्यक्रम गुरुवारी दाखवला जात असे, तर तबस्सुम यांचा 'फूल खिले हैं गुलशन गुलशन' हा मुलाखत कार्यक्रम शुक्रवारी ९.१० वाजता प्रसारित होत असे. शनिवारी संध्याकाळी प्रादेशिक चित्रपट आणि नाटके दाखवली जात, तर रविवारी हिंदी चित्रपट हा आठवड्यातील सर्वात लोकप्रिय कार्यक्रम असे. त्या काळात व्हीसीआर नसल्यामुळे चित्रपट पाहण्याचा हा मुख्य मार्ग होता. ज्यांच्याकडे टीव्ही नव्हता ते शेजाऱ्यांच्या घरी जाऊन कार्यक्रम पाहत असत.

मराठी कार्यक्रमांमध्ये 'चिमणराव' (दिलीप प्रभावळकर), 'हास परिहास' (बबन प्रभू आणि याकूब सय्यद),



'गजरा' (विनोदी स्किट्स), 'सुंदर माझे घर' (सुहासिनी मुळगांवकर) आणि 'प्रतिभा आणि प्रतिमा' (सांस्कृतिक मुलाखती) हे लोकप्रिय होते.

दूरदर्शनने सामाजिक जबाबदारीही पार पाडली. 'आमची माती आमची माणसं' हा शेतीविषयक कार्यक्रम होता, तर 'कामगार विश्व' कामगारांच्या प्रश्नांवर आधारित होता. 'ई-टीव्ही' किंवा 'सॅटेलाईट इन्स्ट्रक्शनल टेलिव्हिजन एक्सपेरिमेंट (SITE)' हा इस्त्रो आणि नासाचा संयुक्त शैक्षणिक प्रकल्प होता. 'आपण यांना पाहिलंत का?' या कार्यक्रमात हरवलेल्या व्यक्तींची माहिती दिली जात असे.

'परिक्रमा' (कमलेश्वर), 'आपका स्वास्थ्य' (डॉ. पदमसिंहवी) आणि 'योगाभ्यास' (धीरेंद्र ब्रह्मचारी) हे माहितीपर कार्यक्रम होते. गुजराती कार्यक्रमांमध्ये 'आवो मारी साथे' (आदी मर्जबान) आणि 'व्हॉट्स द गुड वर्ड' (नंतर सबीरा मर्चंट) यांचा समावेश होता.

संगीतासाठी 'सुगम संगीत', 'शब्दांचे पलीकडे' आणि 'शाम-ए-गझल' हे कार्यक्रम होते. क्रीडा क्षेत्रात 'स्पोर्ट्स राउंडअप' (फ्रेड्रन दे वितरे) आणि 'लुकिंग फॉरवर्ड, लुकिंग बॅक' (बॉबी तल्यारखान) हे कार्यक्रम होते. क्रिकेट सामने थेट दाखवले जात आणि १९७४ मधील इंग्लंड विरुद्धचा सामना हा पहिला प्रसारित सामना होता.

दररोज मराठी, हिंदी आणि इंग्रजी बातम्या प्रसारित होत असत. मराठी बातम्या ७.३० वाजता, हिंदी ९ वाजता आणि इंग्रजी १० वाजता दाखवल्या जात. प्रदीप भिडे, भक्ती बर्वे, स्मिता तळवलकर, स्मिता पाटील, डॉली ठाकूर, लुकू सान्याल, गर्सन डीकुन्हा, निर्मला मठाण आणि प्रताप शर्मा यांसारखे निवेदक लोकप्रिय झाले.

प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी 'आप की राय' (हिंदी) आणि 'आपणे संभोधिने' (गुजराती) हे कार्यक्रम होते. सुरुवातीला जाहिराती स्थिर चित्रांसह दाखवल्या जात, पण नंतर एचएमटी घड्याळे, कॉम्प्लान, थम्स अप, लिरिल यांसारख्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या.

१९८२ मध्ये दिल्लीतील आशियाई क्रीडा स्पर्धांमुळे रंगीत दूरदर्शन सुरू झाले आणि कृष्णधवल युगाचा शेवट झाला. त्यानंतर अनेक चॅनेल्स उपलब्ध झाले, दिवसभर प्रसारण सुरू झाले आणि प्रेक्षकांना अधिक विविधता व स्वातंत्र्य मिळाले. ■■■

# गुजरातच्या ज्वेलर्सचा मोदींना पाठिंबा मात्र उलाढाल ठप्प होण्याचा इशारा

■ अहमदाबाद

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना उद्देशून एक वर्ष सोने खरेदी न करण्याचे



आवाहन केले आहे. या आवाहनावर देशभरातील सराफा व्यावसायिकांनी प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली आहे. पंतप्रधानांचे गृह राज्य असलेल्या गुजरातच्या सराफा व्यापाऱ्यांनी मोदींच्या या आवाहनाबाबत चालाख भूमिका घेतली आहे. एकीकडे मोदींच्या आवाहनाला पाठिंबा दर्शवताना त्यामुळे होणाऱ्या प्रचंड नुकसानीकडे बोट दाखवत मोदींना ८० टक्के उलाढालीवर प्रतिकूल परिणाम होईल आणि या व्यवसायावर अवलंबून असलेल्या हजारो लोकांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण होईल, असा गंभीर इशारा दिला आहे.

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या अमेरिका-इराण युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटाशी सामना करण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी जनतेला त्यागाचे आवाहन केले. एक वर्ष सोने खरेदी करू नका, परदेश वाऱ्या टाळा, पेट्रोल-डिझेलचा काटकसरीने वापर करा आणि स्वयंपाकामध्ये खाद्यतेलाचा वापरही कमी करा, असे आवाहन मोदी यांनी गेल्या रविवारी तेलंगणाच्या सिकंदराबादमध्ये एका जाहीर भाषणादरम्यान केले. मोदींच्या या आवाहनामधील एक वर्ष सोने खरेदी करू नका, हा मुद्दा देशभरातील सराफा व्यावसायिकांना रुचलेला नाही.

# मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणातील पार्थ पवारांच्या कंपनीला दिलासा नाहीच

■ मुंबई

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र, राज्यसभेचे खासदार पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीची मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी २१ कोटींच्या मुद्रांक शुल्क भरण्यास स्थगिती देण्याची मागणी फेटाळण्यात आली आहे. त्यामुळे अमेडियाला २१ कोटींचे मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंडाची रक्कम भरावी लागणार आहे.



मुद्रांक शुल्क वसुली अधिकारी आणि सह निबंधकांनी गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये २१ कोटी रुपये मुद्रांक शुल्क आणि विलंबापोटीचा दंड भरण्याचे आदेश अमेडिया कंपनीला दिले होते. पुण्याच्या मुंढवा येथील ४० एकर जमिनीची खरेदी अमेडिया कंपनीने बेकायदेशीररित्या केली होती. जमिनीच्या कुलमुखत्यारपत्रधारक शीतल तेजवानी यांच्याकडून अमेडियाने ही जमीन खरेदी केली होती. अमेडियाच्या वतीने पार्थ पवार यांचे चुलत भाऊ दिग्विजय पाटील यांनी खरेदी खतावर स्वाक्षरी केली होती. या खरेदी व्यवहाराचा तपशिल माध्यमांमधून जाहीर होताच राज्याच्या राजकीय वातावरणात मोठी खळबळ माजली होती. त्यामुळे नंतर हा व्यवहारच रद्द करण्यात आला. त्यानंतर १ हजार ८०० कोटी रुपये किमतीची ही जमीन पुन्हा बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाकडे हस्तांतरीत करण्यात आली.

दरम्यानच्या काळात अमेडिया कंपनीने २१ कोटी रुपये मुद्रांक शुल्क भरण्यास स्थगिती देण्याची मागणी प्रशासनाकडे केली होती. मुख्य महसूल नियंत्रक अधिकारी रवींद्र बिनवाडे यांनी २८ एप्रिल रोजी अमेडिया कंपनीची मागणी फेटाळून लावली आहे.

# सर्वोदय सहकारी बँकेचा परवाना भारतीय रिझर्व्ह बँकने रद्द केला

■ मुंबई

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**भारतीय** रिझर्व्ह बँकने मंगळवारी मुंबईस्थित सर्वोदय सहकारी बँकेचा परवाना रद्द केला. अपुरी भांडवली क्षमता आणि कमकुवत उत्पन्नाची शक्यता यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेने सांगितले. १२ मे २०२६ रोजी कामकाज संपल्यानंतर बँकेला सर्व बँकिंग व्यवहार करण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच, बँकेचा कारभार गुंडाळून लिक्विडेटर नेमण्याचे निर्देश आरबीआयने महाराष्ट्र सरकारला दिले आहेत. आरबीआयने सांगितले की, बँकेच्या ९८.३६ टक्के ठेवीदारांना डीआयसीजीसी म्हणजे डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन मार्फत पाच लाख रुपयांपर्यंतची विमा संरक्षित रक्कम पूर्णपणे मिळण्यास पात्रता आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत डीआयसीजीसीने २६.७२ कोटी रुपये अदा केले आहेत. आरबीआयच्या मते बँक अनेक नियामक नियमांचे पालन करण्यात अपयशी ठरली असून, सध्याच्या आर्थिक परिस्थितीत ठेवीदारांची संपूर्ण रक्कम परत देणे तिच्यासाठी शक्य नाही.

# भोजशाळा वादप्रकरणी सुनावणी पूर्ण उच्च न्यायालयाचा निकाल राखून

■ इंदूर

**भोजशाळा** मंदिर - कमाल मौला मशीद परिसर प्रकरणातील सुनावणी मंगळवारी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठात पूर्ण झाली असून, न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला आहे. न्यायमूर्ती विजय कुमार शुक्ला आणि न्यायमूर्ती आलोक अवस्थी यांच्या खंडपीठाने या वादग्रस्त संकुलाबाबत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या वैज्ञानिक सर्वेक्षण अहवालावर सर्व पक्षांची बाजू ऐकून घेतल्याचे नमूद केले.



धार जिल्ह्यातील या स्थळाला हिंदू समाज देवी सरस्वतीचे मंदिर मानतो, तर मुस्लीम पक्ष त्याला कमाल मौला मशीद म्हणून ओळखतो. हे वादग्रस्त संकुल सध्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या संरक्षणाखाली आहे. न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशानुसार भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने या परिसराचे सविस्तर सर्वेक्षण करून १५ जुलै २०२४ रोजी आपला अहवाल सादर केला होता. दोन हजारांहून अधिक पानांच्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचा अहवालात धारच्या परमार राजांच्या काळातील भव्य वास्तू या ठिकाणी अस्तित्वात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# कर्जतकरांचा टोरंट प्रकल्पाला विरोध! १८ मे रोजी आंदोलन

■ कर्जत

**कर्जत** तालुक्यात प्रस्तावित टोरंट जलविद्युत प्रकल्पाविरोधात स्थानिक नागरिक, शेतकरी आणि पर्यावरणप्रेमी यांचा विरोध अधिक तीव्र होत आहे. या प्रकल्पाविरोधात १८ मे रोजी आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज वाहून नेण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या उच्चदाब विद्युत वाहिन्यांमुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित होणार आहेत. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषद सदस्य मारुती उर्फ बाबू घारे यांनी पत्रकार परिषदेत केले. टोरंट जलविद्युत प्रकल्पामुळे शेती व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, पर्यावरणावरही त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. भविष्यात अनेक संकटांना सामोरे जावे लागू शकते, असेही त्यांनी सांगितले. या प्रकल्पाच्या विरोधात ५ जून रोजी मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशाराही देण्यात आला असून, १८ मे रोजी आंदोलन करण्यात येणार आहे.

# किशोरी पेडणेकरांवर किरीट सोमय्यांचा शंभर कोटींच्या घोटाळ्याचा आरोप

■ मुंबई

**भाजपा** नेते किरीट सोमय्या यांनी उबाठाच्या नगरसेविका आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावर तब्बल १०० कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा गंभीर आरोप केला आहे. या आरोपामुळे मुंबईच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

सोमय्या यांनी आज पत्रकार परिषद घेऊन पेडणेकर यांच्यावर हा आरोप केला. किशोरी पेडणेकर यांनी मुलुंड येथील कालिदास नाट्यगृह संकुल आणि



अंधेरी येथील शहाजीराजे संकुल १५ वर्षांसाठी एका खासगी डेकोरेटरला भाड्याने दिली होती. या व्यवहारातून सुमारे १०० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला. या कलाक्रीडा संकुलांची जमीन महापालिकेची आहे. १९८९ साली 'ललित कला प्रतिष्ठान' या ट्रस्टची स्थापना करण्यात आली होती. मुंबईकरांसाठी पूर्व उपनगरात कालिदास संकुल आणि पश्चिम उपनगरात शहाजीराजे संकुल उभारण्यात आले होते. या ठिकाणी कला, क्रीडा, नाट्य आणि ललितकलेच्या विकासासाठी सुविधा निर्माण करण्यात आल्या होत्या.

# उन्हाळ्यात 'एसआयआर' नको अश्विनी भिडेंचे आयोगाला पत्र

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी विशेष पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रिया सुरू न करण्याची विनंती निवडणूक आयोगाकडे केली आहे.

पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे मोठ्या प्रमाणावर मुंबईकर शहराबाहेर गेलेले असतात. अशा परिस्थितीत मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया राबवताना तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे ही प्रक्रिया पुढे ढकलणे अधिक योग्य ठरेल.

याशिवाय, सध्या राज्यात जनगणनेचे काम सुरू असल्याने प्रशासनातील कर्मचारी आधीच व्यस्त आहेत. एकाच वेळी जनगणना आणि एसआयआर प्रक्रिया राबवावी लागल्यास कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडेल आणि दोन्ही कामे प्रभावीपणे पार पाडणे कठीण होईल.

# सर्व नगरसेवकांना समान निधी द्या सुनेत्रा पवारांची फडणवीसांकडे मागणी



■ मुंबई

महापालिकेच्या अंदाजपत्रकात निधी वाटपावरून पुन्हा एकदा वाद निर्माण झाला असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून सर्व नगरसेवकांना समान विकास निधी देण्याची मागणी केली आहे.

महापालिकेच्या चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात सत्ताधारी भाजपाच्या नगरसेवकांना झुकते माप मिळाल्याची बाब उघड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी 'सबका साथ, सबका विकास'चा दाखला देत कोणत्याही एका गटाला प्राधान्य न देता सर्व प्रभागांना समान निधी देण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केली आहे. सध्या महापालिकांमध्ये भाजपा नगरसेवकांना प्रत्येकी सुमारे ७ कोटी रुपयांचा निधी दिला जात असल्याची माहिती आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांना सुमारे ५ कोटी रुपये मिळत आहेत. उबाठा आणि इतर विरोधी नगरसेवकांना यापेक्षा कमी निधी दिला जात असल्याची चर्चा आहे. यामुळेच महायुती सरकारमध्ये असतानाही स्थानिक पातळीवर असमानतेचा मुद्दा पुढे आला आहे. राज्यात भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे तीनही पक्ष सत्तेत एकत्र असले तरी, पुणे व पिंपरी-चिंचवडसारख्या महापालिकांमध्ये भाजपा सत्ताधारी असून, राष्ट्रवादी काँग्रेसला विरोधी बाकांवर बसावे लागत आहे.

# भोंदूबाबा अशोक खरातला ५ दिवसांची पोलीस कोठडी

■ नाशिक

**भोंदू** अशोक खरात याला सिन्नर न्यायालयाने १८ मे पर्यंत म्हणजेच ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. जगदंबा पतसंस्था व्यवहार प्रकरणात आधीच सिन्नर पोलिसांच्या ताब्यात असलेल्या खरातविरोधातील तपास आता अधिक तीव्र करण्यात आला आहे. पतसंस्थेतील आर्थिक व्यवहारांप्रकरणी पोलिसांकडून इतर संभाव्य दुवे व संबंधित व्यक्तींचीही तपासणी केली जात आहे. यामध्ये रूपाली चाकणकर यांची महाराष्ट्र पोलीस अकादमीत ६ तास चौकशी करण्यात आली होती. या चौकशीनंतर अवघ्या काही दिवसांतच ईडीने १४ मे रोजी चौकशीसाठी हजर राहण्याचे समन्स बजावले आहेत.

**नामकर्ण आवारेला अटक**

पोलिसांनी शिवनिका संस्थानचे माजी सचिव आणि जगदंबा माता पतसंस्था संचालक नामकर्ण आवारेला अटक केली. या पतसंस्थेत खरातने उघडलेल्या ३२ खात्यांना त्याची सहमती असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यानंतर ही कारवाई केली.

# परदेश दौरे रद्द करा! ताफ्यातील गाड्या कमी करा

■ मुंबई



## मंत्र्यांना आदेश

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि काटकसरीचे आवाहन केल्यानंतर महाराष्ट्रात ते लागू करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आगामी परदेश दौरे रद्द करण्याचे आणि ताफ्यातील गाड्या कमी करण्याचे, चार्टर्ड प्लेनने प्रवास न करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे विविध परदेशी अभ्यास दौरे, शासकीय बैठका आणि इतर कारणांसाठी नियोजित परदेश प्रवास रद्द होणार आहेत. आधीच मंजूर झालेले काही दौरेही आता रद्द केल्याची माहिती आहे. त्यामुळे हे दौरे गैरमहत्त्वाचे होते का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत स्वतःच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी केली. सुरक्षेसाठी १७ पैकी केवळ ८ गाड्या वापरण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी स्वतः इलेक्ट्रिक वाहनाचा वापर सुरू केल्याची माहिती देत इतर मंत्र्यांनाही पर्यावरणपूरक वाहनांचा वापर करण्याचे आवाहन केले. शिंदे यांनी सांगितले की, जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन आयातीचा खर्च वाढत आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने पेट्रोल-डिझेलचा वापर मर्यादित ठेवणे गरजेचे आहे. 'नेशन फर्स्ट' या भूमिकेतून सर्वांनी इंधन बचतीसाठी पुढे यावे.

**पंतप्रधानांच्या ताफ्यात दोनच गाड्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला इंधन बचतीचे आवाहन केल्यानंतर स्वत:ही त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. पंतप्रधान मोदींच्या ताफ्यात यापूर्वी मोठ्या संख्येने गाड्या असायच्या. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी कॅबिनेट बैठकीसाठी आपल्या निवासस्थानावरून फक्त २ गाड्यांच्या छोट्या ताफ्यासह कार्यालयात पोहोचले.

# इराण युद्धावर २९ अब्ज डॉलर खर्च हेगसेथ यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांना काल रिपब्लिकन आणि डेमोक्रेटिक पक्षाच्या खासदारांकडून इराण युद्धावरील अमेरिकेच्या भूमिकेबाबत, वाढत्या खर्चाबाबत आणि अमेरिकेच्या शस्त्रसाठ्यावर होणाऱ्या परिणामांबाबत कठोर प्रश्नांना सामोरे जावे लागले.

अमेरिकेचे संरक्षणमंत्री हेगसेथ यांनी जवळपास दोन आठवड्यांपूर्वी काँग्रेससमोरील सुनावणीच्या तुलनेत यावेळी मवाळ भूमिका घेतली. त्यांनी आपल्या प्रारंभिक भाषणात खासदारांवर थेट टीका टाळत ट्रम्प प्रशासनाकडून शस्त्रनिर्मिती आणि लष्करी क्षमता वाढवण्याच्या प्रयत्नांची माहिती दिली. तरीही, इराण युद्धासाठी तसेच भविष्यातील संघर्षासाठी अमेरिकेकडे पुरेसे क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली आणि दारुगोळा उपलब्ध असल्याचा दावा हेगसेथ यांनी केला. रिपब्लिकन आणि डेमोक्रेटिक सदस्यांनी शस्त्रसाठा कमी होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली होती.